रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २७६
www.ramprahar.com

◆ शनिवार, २५ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आरबीआयकडून पेटीएमचा बँकिंग परवाना कायमचा रद्द



**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी (दि.२४) पेटीएम पेमेंट्स बँकेवर कठोर कारवाई करत त्यांचा बँकिंग परवाना तत्काळ प्रभावाने रद्द केला आहे. बँकिंग नियमन कायदा, १९४९ अंतर्गत हा परवाना रद्द करण्यात आला असून, आता ही बँक भारतात बँकिंग व्यवहार करण्यास पात्र राहणार नाही. आरबीआयने आपल्या आदेशात या कारवाईमागील स्पष्ट कारणे नमूद केली आहेत. बँकेचे कामकाज आणि व्यवस्थापन हे ठेवीदारांच्या हितासाठी नुकसानकारक असल्याचे आरबीआयला आढळून आले. पेमेंट बँक परवान्यासाठी आवश्यक असलेल्या अटींचे पालन करण्यात बँक वारंवार अपयशी ठरली. ज्या ग्राहकांच्या खात्यात किंवा वॉलेटमध्ये आधीच रक्कम शिल्लक आहे, त्यांना ती काढण्यावर किंवा वापरण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. आता ग्राहकांना त्यांच्या पेटीएम बँक खात्यात, वॉलेटमध्ये किंवा फास्टॅगमध्ये नवीन पैसे जमा करता येणार नाहीत.

### अंतरंग

पनवेल महापालिकेची अतिक्रमण हटाव मोहीम/२
रायगडात ३६१ दाम्पत्यांचा नोंदणी विवाह/५
आपत्ती व्यवस्थापनासाठी समन्वय ठेवण्याचे आवाहन/७

# पनवेल मनपा महासभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिकेची महासभा शुक्रवारी (दि.२४) महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये संपन्न झाली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा घेण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे उपस्थित होते. तर सभागृहात सभागृह नेते ॲड प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच महापालिका सदस्य उपस्थित होते. तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविणेत येणारी जयंती उत्सव, साजरे करण्यात येणारे सण व विविध कार्यक्रमानिमित्त इमारती, रस्ते, चौक व स्मारक या ठिकाणी तीन वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर आकर्षक विद्युत रोषणाई उपलब्ध करुन देणे याविषयावर चर्चा करून विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल (पूर्व) सेक्टर १, रोड नं. ४ येथे पावसाळी गटार बांधणे विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी वार्षिक दराने वृक्ष व रोपांचा पुरवठा, लागवड व संगोपन करणे विषयावर चर्चा करण्यात आली, व विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ, ब, क व ड मध्ये अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविणेकामी निविदा मागविणेबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका मालकीच्या बंदर रोड पनवेल येथील १४ द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रातील इलेक्ट्रॉमेकॅनिकल व पंपीग मशीनरी तसेच इमारतीची दुरुस्ती करणे या कामाच्या प्रस्तावास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ०३, खारघर, सेक्टर ३६ मधील मुख्य रस्ता ते स्वप्नपुर्ती गृहसंकुल व व्हॅलीशिल्प पर्यंतच्या रस्त्याचे पुर्नपुष्टीकरण करण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ, ब,क,ड मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरिता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करून परिचलन करणे या कामाचा प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.


नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन पनवेल येथील नवीन ईमारतीमध्ये व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र खारघर येथील नवीन ईमारतीमध्ये डॉयलॅसिस सेंटर मधील रुग्णांसाठी मेडिकल गॅस पाईप लाईनचे काम करून घेणेकरिता प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी व ई निविदा प्रसिध्द करणेकामी मान्यता मिळणेबाबतच्या विषयास चर्चा करून महासभेने मंजुरी दिली.

पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील मध्यवर्ती वातानुकुलित यंत्रणेची तीन वर्षाकरिता दैनंदिन परिचालन देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे विषय मंजूर करण्यात आला.

**झोपडपट्टीधारक पुर्नवसनाच्या विषयाला मंजुरी**

लोकमान्य नगर, मालधक्का येथील भूखंड क्र.३८९ (पनवेल) येथील झोपडपट्टी धारकांच्या पुर्नवसनाचा विषयावर सभागृहात चर्चा करण्यात आली व विषय मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका मालकीची वाहने व जनरेटरकरीता इंधन भरणे या विषयास महासभेने मंजूरी देण्यात आली.

# ‘आप’ला धक्का; सात खासदार होणार भाजपत दाखल



**दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीच्या राजकारणात शुक्रवारी मोठा राजकीय भूकंप झाला आहे. 'आम आदमी पक्षा'चे संस्थापक सदस्य आणि राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी पक्ष सोडल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे, त्यांनी पक्षातील दोन-तृतीयांश खासदारांसोबत भाजपमध्ये विलीन होणार असल्याचे जाहीर केले आहे. या खासदारांमध्ये क्रिकेटर हरभजनसिंग, संदीप पाठक यांच्यासह सात खासदारांचा समावेश आहे.

राघव चड्ढा यांनी संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासह पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सांगितले की, राज्यसभेतील आम आदमी पक्षाच्या दोन-तृतीयांश सदस्यांनी घटनात्मक तरतुदीनुसार भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी त्यांनी पक्षावर आपल्या मूळ मूल्यांपासून भरकटल्याचा आरोप केला. चड्ढा म्हणाले की, ज्या पक्षासाठी मी १५ वर्षे मेहनत घेतली, तो आता आपल्या मूलभूत तत्त्वांपासून दूर गेला आहे. हा पक्ष देशहिताऐवजी वैयक्तिक फायद्यासाठी काम करत आहे. आज मी पक्षापासून दूर होत असून जनतेच्या जवळ जात आहे.

**हे खासदार सोडणार पक्ष**

राघव चड्ढा, स्वाती मालीवाल, अशोक कुमार मित्तल, संदीप पाठक, हरभजन सिंह, राजिंदर गुप्ता, विक्रमजीत सिंह साहनी.

# महाड विधानसभा क्षेत्रातील शिवसेना कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

महाड विधानसभा मतदारसंघातील गोरेगाव जिल्हा परिषद, लोणेरे व मोर्बा पंचायती समितीमधील ठाकरे गटातील व शिवसेनेतील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी उलवे नोड येथे भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

हा पक्षप्रवेश सोहळा भाजपचे प्रदेश चिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी उद्योग व समाजसेवक तसेच कुणबी समाजाचे संघटक सिताराम उभारे, आंबर्ले ग्रामपंचायतीचे सरपंच अंकुश नारायण उभारे, उपसरपंच दिपेश खाडे, ग्रामपंचायत सदस्य एरीना खाडे, स्वाती अरविंद उभारे यांच्यासह परशुराम उभारे, मंगेश कदम, रमेश उभारे, पंढरीनाथ कदम, सुनील शिंदे, रामचंद्र उभारे, अरविंद उभारे आणि रामदास खाडे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

महाड विधानसभा प्रमुख बिपिन महामुनकर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष भालचंद्र महावेद, मंडल अध्यक्ष युवराज मुंडे आणि सुनिल सोनगिरे आदी उपस्थित होते.

# राज्यात पावसाचा खेळ सुरूच!

## उष्णतेसोबतच ‘अवकाळी’, गारपिटीचा इशारा

**मुंबई :** महाराष्ट्रात ऋतुचक्र बिघडत आहे आणि याचा परिणाम म्हणून उष्माघात यांसारखे त्रास जाणवू लागले आहेत. विदर्भात उष्णतेची लाट कायम असून, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात विजांच्या कडकडाटासह गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे, तसेच काही जिल्ह्यांना यलो अलर्टही देण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, बीड, धाराशिव, आणि लातूर या जिल्ह्यांत सोसाट्याचा वर आणि मेघगर्जनेसह पावसाची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## निवडक

### भारतीय नागरिकांना इराणचा प्रवास टाळण्याचे आवाहन

**नवी दिल्ली :** गेल्या काही आठवड्यांपासून अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील संघर्षामुळे इराणमधील आणि अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने आपल्या नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि तातडीची ‘ट्रॅव्हल ॲडव्हायझरी’ (प्रवास मार्गदर्शिका) जारी केली आहे. दोन्ही देशांमधील विमान सेवा मर्यादित स्वरूपात पुन्हा सुरू होत असली, तरी सध्याच्या परिस्थितीत “इराणचा प्रवास टाळावा”, असे स्पष्ट निर्देश परराष्ट्र मंत्रालयाने दिले आहेत.

### नंदुरबारचा पारा ४३ अंशावर; उष्माघात कक्षाची निर्मिती

**नंदुरबार :** जिल्ह्यात उन्हाचा तडाखा वाढत आहे. तसंच तापमानाचा पारा ४३ अंशावर पोहोचला आहे. वाढत्या उष्णतेमुळं नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आरोग्य विभागानं जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये १८ ठिकाणी अत्याधुनिक उष्माघात कक्षांची निर्मिती केली आहे.

# आंबेनळी घाटात भीषण अपघात

## ५०० फूट दरीत कोसळून दाम्पत्याचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आंबेनळी घाटात संरक्षक कठड्यालगत मोटारसायकल अडकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने अपघाताची शक्यता लक्षात घेऊन रेस्क्यू मोहीम राबविण्यात आली. यात ५०० फूट खोल दरीत कोसळलेल्या दुचाकीवरील जोडप्याचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे.

सातारा जिल्ह्यांच्या महाबळेश्वर तालुक्यातील कुंभरोशी गावाजवळ आणि पोलादपूर तालुक्यांच्या सीमेवर प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमचे सदस्य अमित जाधव यांना घाटातील एका धोकादायक वळणावर रस्त्याच्या कडेला संशयास्पद अवस्थेत स्प्लेंडर मोटरसायकल आढळली. याठिकाणी अपघात झाल्याची शक्यता लक्षात येताच अमित जाधव तत्काळ सहकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्सच्या सदस्यांनी घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. **(पान २ वर..)**



# थोर समाजसुधारक जनार्दन भगतसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथी निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार २०२६ स्पर्धा, "श्रीमंत योगी' महानाट्य, त्याचबरोबरीने नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर, सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य त्याचबरोबरीने उरण उपनगराध्यक्ष यांचा सत्कार सोहळा अशी विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची नियोजन बैठक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उलवे नोडमध्ये पार पडली.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या या बैठकीस प्रमुख मान्यवर म्हणून माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, संस्थेचे संचालक अनिल भगत, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, पनवेल महापालिकेचे गटनेते प्रकाश बिनेदार, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, वसंतशेठ पाटील, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, प्रकाश भगत, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, अजय भगत, विश्वनाथ कोळी, विजय घरत, जितेंद्र म्हात्रे, स्वप्नील ठाकूर, जयवंत देशमुख, ॲड. राहुल घरत, सी. एल. ठाकूर, अनिल देशमुख, नाना देशमुख, व्ही. के. ठाकूर, पी.के.ठाकूर, **(पान २ वर..)**

# ‘निपुण महाराष्ट्र’मध्ये रायगड जिल्ह्याची उल्लेखनीय प्रगती

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण सन २०२० नुसार प्राथमिक स्थरावर सन २०२६-२७ पर्यंत पायाभूत व संख्याज्ञान कौशल्ये प्राप्त करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. याकरीता शासनामार्फत ‘निपुण महाराष्ट्र’ अभियान राबवण्यात येत आहे. ह्या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत इयत्ता दुसरी ते पाचवीपर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कौशल्याच्या पडताळणीकरीता मासिक चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ मधील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे अवलोकन केले असता लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील १६७ शाळा राज्यस्तरावर ‘निपुण सुपर स्कूल म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांनी ८० ते १००



टक्के अध्ययन स्तर क्षमता प्राप्त केल्या आहेत.

शासनामार्फत ‘निपुण महाराष्ट्र’ सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता (वाचन व लेखन) आणि संख्याज्ञान कौशल्य (संख्याज्ञान व संख्यावरील क्रिया) यांच्या विकास व्हावा हा ध्यास आहे.

याकरीता राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) लिलिता दहितुले यांच्या संकल्पनेमधून प्रथम एज्युकेशन फाउंडेशन च्या ‘लर्निंग इंप्रूवमेंट प्रोग्राम’ व ओपन लिंक्स फाउंडेशन (विनोबा ॲप) हे उपक्रम राबवण्यात आले. यांचेमार्फत जिल्ह्यातील इयत्ता २ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन, संख्याज्ञान व संख्यावरील क्रियाविषयक विविध पायाभूत, शिष्यवृत्ती व अंतिम मूल्यमापन चाचण्यांद्वारे नियमित सराव घेण्यात आले.

जिल्ह्यातील १६७ शाळा राज्यस्तरावर ‘निपुण सुपर स्कूलश् म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. निपुण महाराष्ट्र अभियानाच्या प्रगतीकरीता व पुढील वाटचालीकरीता रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील व अर्थ व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या व्हॅनचा अपघात

## पाच जणांचा जागीच मृत्यू

**भंडारा : प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्याच्या पवनी तालुक्यातील अड्याळ गावाजवळ गुरुवारी मध्यरात्री वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या मारुती ओमिनी आणि ट्रकच्या झालेल्या भीषण अपघातामध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. तर चार जण गंभीर जखमी झाले आहे. या जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे भरती करण्यात आलेलं आहे. मृतांमध्ये पाच महिलांचा समावेश आहे.

अड्याळ येथील रहिवासी लोमेश नान्हे यांचा मुलाचा लग्न सोहळा कोंढा या गावी होता. लग्न सोहळा आटोपून ९ लोकांचं वऱ्हाड घेऊन मारुती व्हॅन ही गाडी अड्याळच्या दिशेने निघाली. सौंदळ गावाजवळ आल्यानंतर भंडारा वरून पवनीच्या दिशेनं भरधाव वेगाने धावणारा ट्रकशी वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या मारुती व्हॅनची जोरदार धडक झाली. भरधाव ट्रकनं व्हॅनला अक्षरशः चिरडून टाकले. अपघात एवढा भीषण होता की यामध्ये बसलेल्या ९ लोकांपैकी ५ लोकांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामध्ये नवरदेवाचे मामा-मामी यांचाही मृत्यू झालेला आहे.

# रायगडच्या बुद्धिबळपटूंची बाजी

■ सात व नऊ वर्षांखालील खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने आणि लायन सुयोग पेंडसे (डिस्ट्रिक्ट युथ कोऑर्डीनेटर, लायन डिस्ट्रिक्ट ३२३१ A४) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील गोखले सभागृहात जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेतून ७ आणि ९ वर्षांखालील गटातील गुणवान खेळाडूंची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे.

रविवारी पार पडलेल्या या स्पर्धेत महाड, पनवेल, अलिबाग, पेण, कर्जत आणि नवी मुंबई अशा विविध भागांतून एकूण १४६ स्पर्धकांनी आपला बुद्धीचा कस लावला. निवड चाचणीसोबतच ११, १३, १५ आणि १७ वर्षांखालील वयोगटांच्या स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा अत्यंत खेळीमेळीच्या आणि चुरशीच्या वातावरणात पार पडल्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे यांच्या हस्ते झाले. बुद्धिबळ खेळाच्या प्रसारासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. विशेष म्हणजे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी आपला बहुमोल वेळ देऊन संघटनेच्या कार्यकारिणी मंडळाशी चर्चा केली आणि खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले. सुयोग पेंडसे यांनी स्पर्धेसाठी दिलेल्या सहकार्याबद्दल आणि बुद्धिबळाची घड्याळे उपलब्ध करून देणाऱ्या देणगीदारांचे आभार मानले.

स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी टूर्नामेंट डायरेक्टर चंद्रशेखर पाटील यांच्यासह प्रमुख पंच आविष्कार मरभळ, श्रेयस पाटील, सुशील गुरव, अथर्व दातार आणि सिद्धी वानखेडे यांनी काम पाहिले. **(पान २ वर..)**

# दूध भेसळ रोखण्यासाठी 'एआय' आधारित यंत्रणा तयार करावी -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाने टेस्ट स्ट्रीप तयार केली आहे. मात्र, दुधातील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड व आयआयटी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून यंत्रणा तयार करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डचे अध्यक्ष मीनेश शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या कामकाजाची माहिती दिली. या बैठकीस मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर, नॅशनल हेवी इंजिनियरिंग कॉपरेटिव्ह लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक संतोष थॉमस, एनडीडीबीचे क्षेत्रीय प्रमुख व्ही. श्रीनिवास, विदर्भ मराठवाडा डेअरी विकास प्रकल्प संचालक डॉ. संजय गोरानी, मदर डेअरीचे उप महाव्यवस्थापक गौरव गुप्ता उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात सध्या ४० टक्के दूध संघटित क्षेत्रातून प्रक्रिया केले जाते. तर उर्वरित दूध असंघटीत क्षेत्रातून येत असल्याने भेसळीचे प्रमाण मोठया प्रमाणावर आढळते. त्यामुळे अधिकाधिक उत्पादक आणि गावांना संघटित डेअरी व्यवस्थेत आणण्यावर शासनाचा भर आहे. देशभरात ७५ हजार नवीन गावे सहकारी व्यवस्थेत जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळण्यासोबतच भेसळ रोखण्यास मदत होणार आहे. दूध भेसळ रोखण्यासाठी विशेष टेस्ट स्ट्रिप विकसित करण्यात आली असून ही स्ट्रिप यूरिया तसेच इतर भेसळ घटक ओळखण्यास सक्षम असून पुढील सहा महिन्यांत ती पूर्णपणे कार्यान्वित होईल. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.ससससससससससससमीनेश शाह म्हणाले की, राज्य शासनाने केलेल्या सहकार्यामुळे महानंदच्या पुनरुज्जीवनाला गती मिळाली असून सुमारे ७८ टक्के काम पूर्ण झाले आहे. ३ लाख लिटर क्षमतेचा नवीन ग्रीनफिल्ड डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महानंदा परिसरात सिग्नेचर पार्लर आणि अत्याधुनिक इमारत उभारण्यात आल्या आहेत. आरे आणि महानंदा यांच्या ब्रँडचे रिलाँचिंग लवकरच करण्यात येईल. मुंबईतील आरे कॉलनीमध्ये कंप्रेस्ड बायोगॅस प्रकल्प तसेच उदगीर येथे महानंदचे नवीन डेअरी प्लांट उभारण्यात येणार आहे. नागपूरमधील बुटीबोरी येथे अत्याधुनिक डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाच्या वतीने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यात दुधसंकलन वाढविण्यात येत आहे. दुध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या चाचणीसाठी केंद्र शासनाच्या एनपीडीडी योजनेअतंर्गत महानंद डेअरीमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली असल्याचे मीनेश शाह यांनी सांगितले.

## खोपटा पुलावर कंटेनर पलटी; सुदैवाने जीवितहानी नाही

**उरण : प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील खोपटा पुलावर शुक्रवारी सकाळी मालाची वाहतूक करणारा एक अवजड कंटेनर पलटी झाल्याची थरारक घटना घडली. या अपघातातून समोरुन जाणारे दुचाकीस्वार सुदैवाने थोडक्यात बचावले असून मोठा अनर्थ टळला आहे. मात्र, या अपघातामुळे उरण आणि जेएनपीए मार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि.२४) सकाळी ८ च्या सुमारास हा कंटेनर खोपटा-कोप्रोली येथून माल भरुन जेएनपीए बंदराच्या दिशेने निघाला होता. खोपटा पुलावर चढत असताना, समोरुन येणाऱ्या एका दुचाकीला वाचवण्याच्या प्रयत्नात चालकाने कंटेनर डाव्या बाजूला वळवला. मात्र, उतारावर ताबा सुटल्याने हा अवजड कंटेनर रस्त्याच्या कडेला उलटला.

हा अपघात वर्दळीच्या वेळी झाल्याने उरण आणि जेएनपीएकडे जाणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहतूक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने कंटेनर बाजूला सारून रस्ता मोकळा करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले. काही तासांच्या प्रयत्नानंतर या मार्गावरील वाहतूक संथ गतीने पूर्वपदावर आली.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, खोपटा पुलावरील वाढत्या जड वाहतुकीमुळे अपघातांचा धोका पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## कांदळवनाचे संवर्धन गरजेचे; मच्छी प्रजननासाठी एक वरदान

**तळा: प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील खाडी किनारी भागात कांदळवनांमुळे अनेक प्रकारे पर्यावरण संरक्षणासाठी मदत होत असते तळा तालुक्यातील राजापुरी खाडीचा रहाटाड हा एक महत्वाचा जैविक परिसर आहे. येथील खाजण वन हे अनेक सागरी जीवांचे आधार आहेत. यापासून खाडी किनारी असणाऱ्या शेतीलाही फायदा होत असून भरतीचे खाऱ्या पाण्यापासून संरक्षण होण्यास मदत होत असते.



तसेच मान्सूनपूर्व पाऊस सुरूझाले की या खाजण क्षेत्रातील कुजलेल्या पानांवर जाळीसारख्या पसरलेल्या मुळांमध्ये विविध प्रकारचे मासे, कोलंबी, खेकडे , शंख , बोईट , जिताडा इत्यादी माशांचे प्रकार प्रजाननाच्या वेळी जून जुलै महिन्यात येत असतात त्या ठिकाणी त्यांचे संवर्धन व संरक्षण चांगल्या प्रकारे होत असते २०१३ पूर्वी या भागात स्थानिक नागरीक या भागातील वृक्षांची तोंड करून सरपणासाठी लाकडे वापरत असत हि कांदळवने नष्ट होण्याच्या मार्गावर आली होती त्यामुळे सागरी जीवांना प्रजननाच्या कालावधीत सुरक्षितेच्या दृष्टीने या सागरी जीवांवरती संकट ओढवल्याचे चित्र पहावयास मिळत होते काही माशांच्या प्रजाती कमी होऊन या भागात नष्टच होतात कि काय असा प्रश्न निर्माण होऊन संकट ओढवण्याची भिती कोळी बांधव व तज्ञ मंडळी वर्तवत आहेत

सन २०१४-१५ या वर्षात वनविभागा मार्फत रहाटाड येथील दुर्लक्षित कांदळवनांच्या भागात लक्ष घालून माणगाव वन परिक्षेत्रातील तळा तालुक्यातील रहाटाड येथील खाजण क्षेत्रात डूंबी, चिपी, खारफुटी , तीवर इत्यादी प्रकारच्या रोपांची मोठ्या प्रमाणात लागवड केली होती त्याच बरोबर पूर्वीचीही वृक्ष होती आज हे क्षेत्र हिरवागार दिसत असून वृक्षांची चांगल्या प्रकारे वाढ झाली आहे हे खाजण वनक्षेत्र चांगल्या प्रकारे वाढ झाली असल्याने प्रजानन काळात विविध माशांना अंडी घालण्यासाठी चांगल्या प्रकारचे क्षेत्र निर्माण झाल्याने माशांच्या प्रजाती वाढून या भागातील खाडी क्षेत्रात मच्छीत वाढ होऊन कोळीबांधवाना व मच्छीमाऱ्यांना याचा फायदा होईल मात्र यापुढे हा क्षेत्र ओडका बोडका होऊ नये यासाठी अधिकची कांदळ वनांतील रोपांची लागवड करून सवंर्धन केले तर हा जैविक परिसर असल्याने जीव वाढण्यास मदत होईल.

त्यासाठी वनविभागाने कांदळवनांतील वृक्षतोड होऊ नये या कडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.कांदळवने वाढीमुळे जमिनीचीही धूप थांबते अशा विविध प्रकाराने कांदळवनांमुळे पर्यावरणाचे रक्षण होत असते.

कांदळवनांचे जंगल निर्जीव, निष्क्रिय किंवा पडीक वाटत असले तरी पर्यावरणीय परिसंस्थेचे चक्र सुरळीत ठेवण्यासाठी कांदळवनांच्या जंगलांचा मोठा वाटा आहे.हि कांदळवने रक्षणाची ज्यांच्याकडे जबाबदारी आहे त्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

## आंबा पीक विम्यासाठी ७२ तासांच्या आत तक्रार करा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसासह जोरदार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाल्याने हापूस आंबा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर फळपीक विमा योजनेत सहभागी शेतकऱ्यांनी आंबा पिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत विमा कंपनीकडे किंवा कृषी विभागाकडे तक्रार करा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या आंबा पिकासाठी हवामानातील वेगवान वारे हा महत्त्वाचा धोका ठरत आहे. विशेषतः २५ किमी प्रतितास किंवा त्यापेक्षा अधिक वेगाने वारे वाहिल्यास फळगळ होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत विमाधारक शेतकऱ्यांनी त्वरित टोल फ्री क्रमांक १४४४७ वर संपर्क साधून किंवा स्थानिक कृषी विभागाकडे तक्रार दाखल करणे आवश्यक आहे.

जिल्ह्यात 'पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना' अंतर्गत आंबा पिकासाठी ७,०९१ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला असून सुमारे ३,५२५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षणाखाली आहे. काजू पिकासाठीही २०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून ८९ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत स्वयंचलित हवामान केंद्रांद्वारे पर्जन्यमान, तापमान, वाऱ्याचा वेग आणि आर्द्रता यांची नोंद घेतली जाते आणि त्यावर आधारित नुकसानभरपाई निश्चित केली जाते. मात्र, केवळ हवामान केंद्रातील नोंदी पुरेशा नसून प्रत्यक्ष नुकसानीची तक्रार करणे आवश्यक आहे, असे सांगण्यात आले.

दरम्यान, १६ एप्रिल ते १५ मे या कालावधीत वाऱ्याचा वेग २५ किमी प्रतितास किंवा त्यापेक्षा अधिक नोंदवल्यास शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळू शकते. यामध्ये २५ किमी वेगाच्या वाऱ्यासाठी सुमारे २० हजार ३६ रुपये प्रति हेक्टर, तर त्यापेक्षा अधिक वेग असल्यास ३४ हजार रुपये प्रति हेक्टरपर्यंत भरपाई देय राहणार आहे.

पान १ वरुन

## आंबेनळी घाटात भीषण अपघात

रेस्क्यू टीमने दोरांच्या साह्याने सुमारे ५०० फूट खोल दरीत उतरून धोकादायक परिस्थितीत शोधकार्य सुरू केले. गार हवा, अंधार, निसरडे उतार, दाट धुके आणि पाऊस सुरू झाल्याने रेस्क्यू मोहीम आव्हानात्मक झाली. रात्री सुमारे दीड वाजेपर्यंत सुरू मोहिमेत अथक प्रयत्नांनंतर प्रथम पुरुषाचा मृतदेह शोधून बाहेर काढण्यात यश आले. यानंतर प्रतिकूल हवामानामुळे उर्वरीत रेस्क्यू वर्क थांबविण्यात आले.

यानंतर शुक्रवारी २४ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ९ वाजता पुन्हा रेस्क्यू मोहीम नव्या जोमाने व नियोजनबध्द. सुरू करण्यात आली. तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर मोटारसायकलवरील महिलेचा मृतदेहदेखील दरीतून बाहेर काढल्यानंतर संपूर्ण रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण झाले. या दुर्घटनेत मृतांची ओळख मोहन चव्हाण (वय ५५) आणि जयश्री चव्हाण (वय ४८, रा. सोनगिरवाडी, जि. सातारा) अशी पटली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलादपूर व महाबळेश्वर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

## थोर समाजसुधारक जनार्दन भगतसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम



यांच्यासह जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे पदाधिकारी व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही देण्यात येणार आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींचे स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण करण्यात येत आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना ०७ मे रोजी उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे होणाऱ्या पुण्यतिथी कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबरीने "श्रीमंत योगी' महानाट्य", तसेच नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा या आयोजित कार्यक्रमाचा नियोजन आढावा घेण्यात आला.

## रायगडच्या बुद्धिबळपटूंची बाजी

बक्षीस वितरण समारंभाला सचिव सुशील गुरव, आल्हाद पाटील, सी.एन. पाटील, पनवेल चेस असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर परांजपे आणि अंकित जोशी यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

यशस्वी स्पर्धकांना एकूण ४२ चषक आणि ४० पदके प्रदान करण्यात आली.निवड झालेल्या खेळाडूंमध्ये सात वर्षांखालील गटात आद्वीक वर्मा, विहान वैद्य (मुले) आणि मनस्वी आडे, सानवी निमावत (मुली) यांचा समावेश आहे, जे पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. तसेच ९ वर्षांखालील गटात आद्वीक वर्मा, अंश दधीच (मुले) आणि लावण्या सिंग, अस्मी राजपूत (मुली) यांची छत्रपती संभाजीनगर येथे २ व ३ जून रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यासह ओजस पाटील, कुणाल खारतोडे, ह्रतवी म्हात्रे, ओवी समेल, ॲलन जॅकोब, अनिष्का कोळी यांसारख्या खेळाडूंनीही आपापल्या गटात चमकदार कामगिरी करत पहिल्या पाच क्रमांकांत स्थान पटकावले.

गोखले सभागृहाने उपलब्ध करून दिलेले सहकार्य आणि कर्मचारी वर्गाच्या मदतीने ही स्पर्धा निर्विघ्नपणे पार पडली.

## जनगणना प्रगणक व पर्यवेक्षक यांना १५ दिवसीय प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारच्या वतीने सन २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या तयारीस सुरुवात करण्यात आलेली आहे. यंदाची जनगणना डिजिटल पद्धतीने होत असून नागरिकांसाठी स्व-नोंदणी करण्याचा पर्याय देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाईन पद्धतीने नोंदविणे अधिक सुलभ होणार आहे.



### नागरिक घरबसल्या स्वतही करू शकतात ऑनलाईन स्व-नोंदणी

या जनगणना प्रक्रियेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त मास्टर ट्रेनर यांचेमार्फत एकूण ४५ फील्ड ट्रेनर्सना दि. ६ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत सखोल प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये डिजिटल ॲपचा वापर करण्याची प्रक्रिया, माहिती संकलनाची पद्धत तसेच नागरिकांशी संवाद साधून माहिती संकलित करण्याचे कौशल्य या बाबींचा समावेश होता. यापुढील टप्प्यात प्रशिक्षित फील्ड ट्रेनर्समार्फत प्रगणक व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदर ४५फिल्ड ट्रेनर हे जनगणनेच्या कामासाठी प्रत्यक्ष घरोघरी भेट देणारे नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रगणक व पर्यवेक्षक यांना दिनांक २३ एप्रिल ते ८ मे २०२६ पर्यंत १५ दिवस प्रशिक्षण देणार आहेत. या प्रशिक्षण वर्गास २३ एप्रिलपासून सर्वच विभागांत सुरूवात झालेली आहे. आठही विभाग कार्यालयांमध्ये प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी ३७०० प्रगणक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रत्येकी ४० ते ५० प्रगणक व पर्यवेक्षकांच्या एकूण ७७ बॅच तयार करण्यात आल्या असून, हे प्रगणक व पर्यवेक्षक दिनांक १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन जनगणनेची माहिती संकलन करण्याचे काम करणार आहेत. ही सर्व संकलित माहिती डिजिटल पध्दतीने जनगणना व्यवस्थापन आणि निरीक्षण प्रणाली अर्थात यावर नोंदवली जाणार आहे. तरी सर्व नागरिकांनी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत se.census.gov.in या जनगणना पोर्टलला भेट देऊन स्वतःची माहिती स्वतः भरावी असे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांनी जनगणना प्रक्रियेचे महत्व लक्षात घेऊन त्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा आणि देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेली अचूक व विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून द्यावी असे आवाहन आहे.

सदर प्रशिक्षण व जनगणना प्रक्रिया ही आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी तसेच उपआयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संबंधित विभागातील चार्ज अधिकारी व सहाय्यक आयुक्त यांच्या देखरेखीखाली यशस्वीरित्या पार पाडली जात आहे.

## पनवेल महापालिकेची सर्व प्रभागात अतिक्रमण हटाव मोहीम; पर्यवेक्षक बदलले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


पनवेल महानगरपालिकेमार्फत गेल्या काही दिवसापासून अतिक्रमण हटाव संदर्भात मोठ्या प्रमाणात मोहिम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत कोणत्याही अतिक्रमणाबाबत दुर्लक्ष केले जाणार नाही. तसेच कामाबाबत कसूर करणाऱ्यांच्याबाबत गय केली जाणार नाही. अतिक्रमणाबाबत कारवाई करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने, जागरूकतेने कारवाई करावी. कोणत्याही अमिषास बळी पडू नये, अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देशआयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत.

सर्व प्रभागात कारवाई गेल्या काही दिवसांपासून कामोठे, खारघर, पनवेल, कळंबोली अशा चारही प्रभागात अतिक्रमणाबाबतच्या तक्रारी, विविध माध्यमातून येत होत्या, त्यावर आळा घालण्यासाठी आयुक्तांनी कठोर कारवाईची पाऊले उचलली असून अतिक्रमण विभागात सध्या कार्यरत असलेल्या सर्व पर्यवेक्षकांना बदलले. तसेच त्यांच्या जागी अन्य विभागातील पर्यवेक्षक देण्यात आले आहेत. अतिक्रमण हटाव कामात हलगर्जीपणा केल्याचे निर्दशनास आल्याने पर्यवेक्षक प्रशांत गायकर यांना निलंबित केले आहे.

अतिक्रमण विभागाच्यावतीने सध्या जोरदार कारवाई सुरू असून यात प्रामुख्याने अनधिकृत बॅनर व होर्डिंग्जवर तोडक तसेच अनधिकृत आठवडी बाजारांवरही कारवाई करण्यात आली. आठवडी बाजार बंद करण्यात आले. याचबरोबरीने फूटपाथवरील अतिक्रमणाविरोधातही कारवाई करण्यात आली आहे. खारघर येथील मोठमोठ्या हॉटेल्स बाहेरील सिमांत भागातील बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आली आहे. कामोठ्यातील नर्सरी व हातगाड्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. विशेष टास्क फोर्स महापालिकेमार्फत अतिक्रमण हटाव मोहिमेसाठी विशेष टास्क फोर्स तयार करण्यात येत आहे. यामध्ये १० सुरक्षा रक्षक व १० अतिक्रमण विभागाचे कर्मचारी असतील.तसेच रात्रीच्या वेळीही गस्त घालण्यात येणार आहे. अतिक्रमण संदर्भात विशेष दखल घेत प्रभागनिहाय महापालिका सदस्यांच्या समवेत बैठका घेऊन, त्यांच्याकडून आलेल्या सूचनांची तात्काळ दखल घेण्यात येत आहे, अशी माहिती अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिली आहे. अतिक्रमणाबाबत नागरिकांना कोणतीही तक्रार करावयाची असल्यास महापालिकेच्या पनवेल कनेक्ट ॲपवर करावी, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

## दुखवटा

### उज्वला भावे



**खोपोली:** संत साहित्याचा गाढा अभ्यास, शिक्षण क्षेत्रातील निष्ठावंत सेवा आणि अध्यात्मिक कार्यातून समाजमनाला समृद्ध करणाऱ्या श्रीमती उज्वला रामचंद्र भावे यांचे आज, शुक्रवार २४ एप्रिल रोजी सकाळी १०:१५ वाजता दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८३ वर्षे होते. खोपोली नगरपरिषद शाळा क्रमांक १ च्या निवृत्त मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी अनेक पिढ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कारांचे धडे दिले.

# रिस, मोहोपाडा, वासांबे येथील आरोग्य उपकेंद्रांचा कृष्णा पारगे, नेहा पारगेंकडून आढावा

**रसायनी : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे तसेच वासांबे जिल्हा परिषद सदस्य नेहा पारंगे यांनी रीस, मोहोपाडा व वासांबे येथील आरोग्य उपकेंद्रांना भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.



दौऱ्यादरम्यान पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य यांचे स्वागत करण्यात आले तसेच त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. भेटीदरम्यान त्यांनी आरोग्य सुविधांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी व आव्हानांची सखोल माहिती घेतली व दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.रीस उपकेंद्राच्या पुनर्बांधणीची गरज असून मोहपाडा उपकेंद्राच्या त्वरित दुरुस्तीबाबत सकारात्मक भूमिका घेतली. सध्या मोहपाडा उपकेंद्रात कार्यरत असलेल्या वासांबे उपकेंद्रासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून नवीन इमारत उभारण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच उपकेंद्र स्तरावर रिक्त असलेली CHO व इतर पदे लवकरात लवकर भरण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

अनेक भौतिक अडचणी असूनही रीस उपकेंद्राने विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. यानंतर त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे भेट दिली. येथे पंचायत समिती सदस्या गौरी गडगे या भेटीसाठी आल्या त्यांचे स्वागत करण्यात आले आणि पुष्पगुच्छ देऊनसन्मान करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोपच्या स्वच्छता, उत्कृष्ट टीमवर्क व एकूणच कार्यपद्धतीबद्दल सर्वांनी मनापासून प्रशंसा व्यक्त केली. रायगड जिल्ह्यात प्रथमच मिळालेल्या NQAS राज्यस्तरीय प्रमाणपत्रामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोपने जिल्ह्यात सर्वाधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून कायाकल्प स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला असल्याबद्दलही विशेष कौतुक करण्यात आले.

तसेच येथे राबवण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे, सौरऊर्जेवर आधारित ऑन-ग्रिड व ऑफ-ग्रिड प्रणालीच्या वापराचे तसेच बिर्ला कार्बन, श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्था आणि एमजीएम रुग्णालय, कामोठे यांच्या सहकार्याने चालवण्यात येणाऱ्या विशेष ओपीडी सेवांचेही त्यांनी कौतुक केले.

भविष्यात प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोपला अधिक सक्षम करण्यासाठी परिचारिका, सुरक्षा रक्षक व शिपाई पदांची भरती तसेच आवश्यक औषधी उपकरणे साहित्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र येथील अधिकारी-कर्मचारी यादरम्यान उपस्थित होते. संपूर्ण दौऱ्यादरम्यान तालुका आरोग्य अधिकारी डॉ कल्याणी इंगोले आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश देशमुख हे उपस्थित होते. यावेळी परिसरातील पत्रकार अनील भोळे, बी एस कुलकर्णी, आनंद पवार आदी उपस्थित होते.

# उरणमधील शकुंतला भारत गॅस एजन्सीवर कारवाई

**उरण : वार्ताहर**



गॅस धारकांशी अरेरावी करणे, बेकायदा गॅस सिलिंडर विकणे अशा अनेक प्रकारच्या तक्रारी वाढत असल्याने शकुंतला भारत गॅस या एजन्सीवर तालुका प्रशासनाने कारवाई केली आहे. एजन्सीला तत्काळ पुरवठा बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, वितरणाचा परवानादेखील रद्द करण्यात येणार असल्याची माहिती तालुका पुरवठा अधिकारी गजानन देशमुख यांनी दिली.एकंदरीत तालुक्यातील ही पहिलीच कारवाई ठरली आहे.

शकुंतला भारत गॅस या एजन्सीकडे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर विक्रीचा अधिकृत परवाना आहे. मात्र सिलिंडर वितरण करताना राज्य सरकारने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमाचे पालन न करता गॅस धारकांशी अरेरावी करणे, अनधिकृत व नोंदणी नसलेल्या व्यक्तींना सिलिंडर वाटप कारणे उरण पूर्व विभागात मोठीजुई कळंबुसरे कोप्रोली खोपटे परिसरात वेळेवर वाटप न करणे .अशा अनेक तक्रारी उरण तहसील कार्यालयाकडे प्राप्त होत असत, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये एलपीजी पुरवठ्याबाबत गैरसमज निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन उरणचे तहसीलदार डॉ उध्दव कदम यांनी तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. या आदेशांची तातडीने तालुका पुरवठा अधिकारी गजानन देशमुख यांनी अंमलबजावणी करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याच्या साठी प्रयत्न असून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनाही सदरची माहिती देऊन पनवेल येथील वांरगे बंधू यांच्या पनवेल गॅस सर्व्हिसला उरण तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडर चे वितरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**उरण तालुक्यातील २० हजार धारकांना घरगुती गॅस सिलेंडरचे वितरण हे शकुंतला भारत गॅस एजन्सी करत आहे.परंतु सदर एजन्सी विरोधात अनेक तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर शकुंतला भारत गॅस एजन्सी विरोधात कारवाई करण्यात आली आहे.**

**-डॉ.उध्दव कदम, तहसीलदार उरण**

## निवडक

### करंजाडेतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे सेक्टर आर ३ येथून एक २६ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर सोनावणे असे या तरुणाचे नाव असून त्याचा रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची पाच फूट आठ इंच, डोक्याचे केस काळे व मध्यम, डोळे काळे, अंगामध्ये नेसुन लाल लाल रंगाचा टीषर्ट व काळया रंगाची हाफ पन्ट, पायात लाल काळया रंगाची चप्पल असा पेहराव आहे. सदर तरुणाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### सोन्याचे पदक चोरले

**पनवेल :** ८० वर्षीय महिलेच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे पदक चोरल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मंगलाबाई भोईर या नितळस येथे राहत असून १८ एप्रिल रोजी त्यांचे कुटुंबीय हळदीसाठी गेले होते. रात्री नऊच्या सुमारास त्या घरामध्ये बसल्या होत्या. रात्री साडेनऊच्या सुमारास एक अनोळखी पुरुष त्यांच्याजवळ आला आणि त्यांच्या कडील सोन्याचे पदक गळ्यातून खेचून तो अंधारात पळून गेला.

### करंजाडेतून गाडीची चोरी

**पनवेल :** करंजाडे येथील आर-५ वडघर येथे पार्क केलेली मोटारसायकल अज्ञाताने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिंतामणी घोपरकर यांनी आपली ४५ हजार रुपये किंमतीची ग्रे रंगाची होंडा कंपनीची स्कुटी करंजाडे येथील महाराष्ट्र अँटो गॅरेज समोर पार्क करून ठेवली असता अज्ञात इसमाने ती चोरून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बॅटऱ्यांची चोरी; गुन्हा दाखल

**पनवेल :** बॅटरी रूममधून ५२ बॅटऱ्यांची चोरी केल्याप्रकरणी अमित सेवेन्द्र त्रिपाठी आणि सुरेश तिवारी (दोघेही राहणार मध्य प्रदेश) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ए एम एल एफ ट्रान्सपोर्ट, पार्किंग यार्ड, कोन फाटा येथे सिक्युरिटी गार्ड अमित त्रिपाठी याच्या ताब्यात एक लाख तीस हजार रुपये किमतीच्या बॅटऱ्या कंपनीच्या मालकाने दिल्या होत्या. यावेळी अमित आणि त्याचा मित्र सुरेश तिवारी यांनी संगनमत करून पार्किंग यार्ड मधून बॅटऱ्या चोरून नेल्या.

### काशिनाथ जाधव यांना पुरस्कार

**पनवेल :** पनवेल तालुका निवृत्त सेवक मंडळाचे अध्यक्ष श्री काशिनाथ जाधव यांनी केलेल्या सामाजिक प्रशासकीय कार्याबद्दल त्यांची आविष्कार फाऊंडेशन कोल्हापूर यांच्या तर्फे "राज्यस्तरीय क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज भूषण पुरस्कार २०२६"करिता निवड करण्यात आली असून रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता हॉटेल जानकी, कुंभारमाठ, मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथे त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्माणीत करण्यात येणार आहे. त्यांच्या मित्र परिवाराकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

### चेन जबरीने खेचून चोरी

**पनवेल :** चाकूचा धाक दाखवून सतरा ग्राम वजनाची सोन्याची चेन जबरीने खेचून चोरी केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल बाजूने नवीन पनवेल कडे जाताना रेल्वे क्रॉसिंग ब्रिजच्या खालील बोगद्यामध्ये संतोष गुप्ता (राहणार सेक्टर १३, नवीन पनवेल) हे पल्सर मोटरसायकल वरून आले. यावेळी दुसऱ्या मोटरसायकल वरून आलेल्या तीन अनोळखी इस्मानी त्यांना अडवले आणि चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरदस्तीने खेचून चोरी करून ते निघून गेले.

### मोबाईल, लॅपटॉपची चोरी

**पनवेल :** कळंबोली सेक्टर १२, येथील घरात प्रवेश करून चोराने मोबाईल आणि लॅपटॉप चोरून नेले. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सौरभ सिंग हे सेक्टर १२, कळंबोली येथे राहत असून त्यांच्या घरात आरोपीने प्रवेश केला आणि घरातील २६ हजार रुपये किमतीचे ४ मोबाईल, १५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेले.

# किशोर वय आणि मासिक पाळी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कुल cbse, उलवे येथे २३ एप्रिल २०२६ रोजी किशोर वय आणि मासिक पाळी स्वच्छता या विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थीन मध्ये किशोरवयातील शारीरिक व मानसिक बदलांविषयी योग्य माहिती देणे तसेच मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे हा होता.



या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी इशियन नेटवर्क फाउंडेशनच्या डॉक्टरांची टीम व पालक प्रतिनिधी समितीचे सदस्य ला, महिला पालक वर्ग उपस्थित होते. मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यानंतर मार्गदर्शन सत्राला सुरुवात करण्यात आली. Adolescent Health Session हे सत्र डॉ. पद्मजा कुंभार आणि डॉ. याशिका टंडन यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी किशोरवयातील बदल, हार्मोन्सचे परिणाम तसेच मानसिक आरोग्य याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच, Menstrual Hygiene Session हे सत्र डॉ. पद्मजा कुंभार (MS, DNB, Obstetrics and Gynaecology, PhD Research Scholar) आणि डॉ. प्रतेक्षा सक्सेना (MBBS, MS Obstetrics and Gynaecology Resident) यांनी घेतले. त्यांनी मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया असून त्याबाबत कोणतीही लाज किंवा भीती बाळगू नये, असे सांगितले.

याशिवाय, स्वच्छता राखण्यासाठी काय करावे, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर, नियमित बदल, स्वच्छ पाणी व साबणाचा वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांचे व पालक यांचे योग्य मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थिनींनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली आणि आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला आणि सर्व उपस्थितांनी त्याचे कौतुक केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा सामाजिक उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवार दिनांक २३ एप्रिल रोजी बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज) (मॅनेजमेंट स्टडीज) विभागातर्फे सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या उद्देशाने जॉय ऑफ गिविंग हा विशेष सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. रीत ठुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमांतर्गत बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज) शाखेतील आठ विद्यार्थ्यांचा गट व प्राध्यापकांसह खारघर येथील गिरिजा वेल्फेअर असोसिएशनला भेट देली. यावेळी विद्यार्थ्यांनी तेथील मुलांना अन्नधान्य व शालेय साहित्याचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक कार्याचा अनुभव मिळाला तसेच विद्यार्थ्यांनी मुलांशी संवाद साधत त्यांच्यासोबत वेळ घालवला, ज्यामुळे त्यांच्यात सहानुभूती, करुणा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळत असल्याचे प्राध्यापकांनी नमूद केले.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांनी बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज) विभागातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक यांचे अभिनंदन केले व त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. या सामाजिक उपक्रमासाठी बी.कॉम (मॅनेजमेंट स्टडीज) विभागातील सर्व प्राध्यापक आदी उपस्थित होते.



# गव्हाण विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी यांचा सेवापूर्ती समारंभ

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी हे त्यांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत असल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सेवापूर्ती समारंभ रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

अध्यक्ष पदावरून बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चंद्रकांत मढवी यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल गौरव उद्गार काढून प्रामाणिक लेखनिक म्हणून त्यांनी प्रदीर्घ सेवा दिली, त्यांच्या संयमी, निस्वार्थी, निगर्वी व प्रामाणिक सेवे बद्दल त्यांचे कौतुक करून त्यांनी नेहमी सुखी समाधानी आयुष्य जगल्याबद्दल सुखी माणसाचा सादरा शोधणाऱ्यांनी चंद्रकांत मढवी यांचा समाधानी वृत्तीचा बोध घ्यावा, असे आवाहन करून त्यांचे कौतुक केले.

यावेळी चंद्रकांत मढवी यांचा व त्यांच्या सौभाग्यवती स्मिता चंद्रकांत मढवी यांचा विद्यालयाच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, कामगार नेते महेंद्र घरत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव व्ही.व्ही.पाटील, गव्हाणचे माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, ॲड. राहुल घरत, माजी प्राचार्य साधना डोईफोडे, अजित डोईफोडे, चंद्रकांत मढवी यांच्या मातोश्री बेबी गजानन मढवी, मो.का.मढवी गुरुजी, जो.बा.पाटील गुरुजी, रवींद्र पाटील, नवी मुंबई महापालिकेच्या नगरसेविका मीरा संजय पाटील, वसंत मढवी यांच्यासह निलेश खारकर, सुधीर ठाकूर, सुदर्शन घरत, अनुसया घरत, बी. टी. कांबळे गुरुजी, विद्यालयाच्या प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी आभार प्रदर्शन केले. उलवे येथील शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे प्राचार्य दीपक भरणुके यांनी लिहिलेल्या मानपत्राचे सागर रंधवे यांनी वाचन केले.



# बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२३ एप्रिल रोजी खारघर रेल्वे स्टेशन या ठिकाणी बेशिस्त ऑटो रिक्षा चालक संबंधाने विशेष कारवाई करिता खारघर वाहतूक शाखा व प्रादेशिक परिवहन विभाग, पनवेल विभाग यांची संयुक्त कारवाई मोहीम आयोजित करण्यात आली.



या विशेष कारवाईमध्ये एकूण ६५ बेशिस्त ऑटो रिक्षा चालक तसेच इतर वाहन चालकांविरुद्ध मोटर वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान फिटनेस संपलेल्या २ ऑटोरिक्षा पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. यावेळी खारघर वाहतूक शाखेचे वपोनी मुजावर तसेच पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार व निरीक्षक शितोळे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पवार, वाहतूक शाखेचे पोउपनी शिदोरे व ६ अंमलदार हजर होते.

# प्रगत काइफोप्लास्टीमुळे रुग्णाला मिळाले जीवदान

**पनवेल :** पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झालेल्या ६८ वर्षीय महिलेला अत्याधुनिक आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह 'काइफोप्लास्टी' उपचारामुळे केवळ काही दिवसांत पुर्ववत चालता येऊ लागले असून रुग्णाचा आत्मविश्वासही वाढला आहे. खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक यांच्या नेतृत्वाखाली टीमने या रुग्णावर यशस्वी उपचार केले. रुग्णाला पूर्वीपासूनच उच्च रक्तदाब, इस्केमिक हार्ट डिसीज (पूर्वी स्टेंट बसविला होता), पार्किन्सन आजार आणि हायपोथायरॉईडीझम अशा अनेक आरोग्य समस्या होत्या. त्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मत होते. मात्र वेळीच निदान आणि प्रगत उपचारांमुळे रुग्ण लवकर बरी झाली आणि पुन्हा हालचाल करू लागली.

# महिलेला चाकूने आणि लोखंडी स्टिकने मारहाण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रस्त्यावरील क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून चाकू आणि बेसबॉल लोखंडी स्टिकने मारून जखमी केल्याप्रकरणी कारचालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २३ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

पायल चौधरी या रिसवाडी येथे राहत असून त्या २३ एप्रिल रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास मोटरसायकल वरून कळंबोली येथून रसायनी येथे घरी जात होत्या. पावणे एकच्या सुमारास डी मार्ट समोर पळस्पे फाटा जवळून जात असताना दुसऱ्या गाडीला जाण्यासाठी रस्ता कमी पडत होता. यावेळी त्यांच्या पाठीमागून चार चाकी गाडी ओव्हरटेक करायला लागला. यावेळी त्याने शिवीगाळ केली आणि कार मधून चालक खाली उतरला. त्याने डिकीमधून लोखंडी स्टिक आणि चाकू घेऊन आला आणि पायलच्या हातावर मरून तिला जखमी केले.

# शिल्प चौक येथे बस थांबा सुरू होणार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

प्रभाग क्र.४ मधील नागरिकांच्या मागणीनुसार सेक्टर-२१ येथील शिल्प चौक येथे बस थांबा सुरू करण्याबाबत नगरसेविका परेशा ब्रिजेश पटेल यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

यासंदर्भात नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झाला आहे. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या मार्ग क्र. ५५ वरील बसेस आता सेक्टर-२१ येथील शिल्प चौक येथे (तळोजाकडे जाताना) थांबविण्यात येणार आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा अधिक सोयीस्कर लाभ मिळणार असून प्रवाशांच्या चढ-उतारासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

परिवहन विभागाने चालक व वाहकांसाठी आवश्यक सूचना जारी केल्या असून संबंधित मार्गावरील बससेवा शिल्प चौक येथे नियमित थांबेल. नागरिकांच्या सुविधेसाठी करण्यात आलेल्या या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

## संपादकीय

# मराठीच्या सन्मानाचा सण!

मराठीच्या आग्रहाची महाराष्ट्र शासनाची भूमिका केवळ परभाषाद्वेषाची नसून तो राज्यभाषेचा सन्मान राखत सार्वजनिक सेवेत गुणवत्ता आणि सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न आहे.

**महाराष्ट्रात पुढच्या शुक्रवारी साजऱ्या होणाऱ्या उत्सवाला एका नव्या उत्साहाची झालर लाभलेली असेल. कारण, भाषावार प्रांतरचनेच्या सूत्रानुसार मराठी भाषकांचा प्रांत म्हणून स्थापन झालेल्या महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठी भाषेच्या उपेक्षेची खंत पुसण्याच्या प्रयत्नाची फळे त्या दिवशी चाखावयास मिळतील. महाराष्ट्रातील रिक्षा व टॅक्सी व्यवसायावरील परभाषकांच्या वर्चस्वामुळे, मराठी भाषेला निमूटपणे हिंदी भाषेतील संवादाचा सहारा घ्यावा लागतो, ही खंत पुसण्याच्या प्रयत्नांचे पडसाद आता राज्यात उमटू लागले असले, तरी यापुढे किमान संवादासाठी परभाषकांनाच मराठीचा आश्रय घ्यावा लागेल, हे स्पष्ट झाले आहे. भाषा हे केवळ भावना व्यक्त करण्याचे किंवा संवादाचे साधन नाही, तर ते त्या त्या प्रांताच्या जनतेचे अस्मिताचिन्ह असते. भाषावार प्रांतरचना स्वीकारली तेव्हाच भाषेचे हे महत्व अधोरेखित झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील रिक्षा-टॅक्सीचालकांनीच मराठी भाषेत प्रवाशांसोबत संवाद साधावा ही राज्य शासनाची भूमिका निश्चितच स्वागतार्ह ठरते. रिक्षा टॅक्सीचालकांना मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान अनिवार्य करण्याचा शासनाच्या या निर्णयावर सध्या उलटसुलट चर्चा सुरू झाली असली, तरी सार्वजनिक सोयी, प्रशासनिक सुसूत्रता आणि सांस्कृतिक ओळख यांची गरज पाहता, या निर्णयाकडे 'सक्ती'म्हणून नव्हे, तर 'व्यवहार्य गरज'म्हणून पाहणे योग्य ठरेल. राज्यातील अनेक शहरांमध्ये, विशेषतः महानगरांमध्ये, प्रवासी आणि चालकांमधील संवादात केवळ भाषेमुळे विसंवाद होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. मार्ग विचारणे, भाडे ठरवणे, किंवा आपत्कालीन प्रसंगी सूचना देणे या सर्व बाबींमध्ये भाषेची अडचण निर्माण होत होती. अशा परिस्थितीत स्थानिक भाषेचे किमान ज्ञान असणे ही केवळ अपेक्षा नसून, सार्वजनिक सेवेत आवश्यक अट ठरते. मुळातच, हा काही नवीन नियम नाही. महाराष्ट्र मोटार वाहन नियमांनुसार परवाना देताना स्थानिक भाषेचे ज्ञान अपेक्षित होतेच; आता केवळ त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजेच अचानक, सक्तीने काही लादलेले नसून, अस्तित्वात असलेले नियम अमलात आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यासोबतच चालकांसाठी मराठी शिकण्यासाठी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याची भूमिकाही शासनाने घेतली आहे. जिथे काम करावे, तेथील भाषेचे संवादापुरते ज्ञान तरी असावे, हे तत्त्व जगभर मान्य आहे. भारतातील इतर राज्यांत हीच भूमिका स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्राने मराठीबाबत घेतलेली भूमिका वेगळी किंवा अतिरेकी म्हणता येणार नाही. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसते; ती संस्कृती, इतिहास आणि ओळख यांची वाहक असते. मराठी भाषेला संत साहित्य, समाजसुधारकांची परंपरा आणि समृद्ध साहित्यिक वारसा लाभलेला आहे. अशा भाषेचा सार्वजनिक व्यवहारात सन्मान राखणे ही त्या समाजाची नैसर्गिक अपेक्षा असते. मराठी शिकणे ही लादलेली शिक्षा नसून, त्या भूमीशी आणि समाजाशी नाते जोडण्याची प्रक्रिया आहे. ज्या राज्यात आपण उपजीविका करतो, त्या राज्याच्या भाषेला किमान आदर देणे ही केवळ औपचारिक अट नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे मराठीची सक्ती हा वादाचा मुद्दा न ठरता, मराठीचा सन्मान आणि व्यवहारातील उपयोग यांचा संतुलित विचार म्हणून हा निर्णय स्वीकारला जाणे अधिक उचित ठरेल.**

# आज जागतिक मलेरिया दिन

जागतिक मलेरिया दिन हा दरवर्षी २५ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक आरोग्य सेवा जागरूकता कार्यक्रम आहे , जो विविध स्थानिक आणि सरकारी आरोग्य सेवा अधिकारी आणि धोरणकर्त्यांना मलेरियाशी लढण्यासाठी आणि त्याचे निर्मूलन करण्यासाठी आवश्यक असलेल्या कृतींना प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक आवाहन आहे. मलेरिया हा एक तीव्र तापाचा आजार आहे. रोगप्रतिकारक शक्ती नसलेल्या व्यक्तीमध्ये, संसर्गजन्य डास चावल्यानंतर साधारणपणे १०-१५ दिवसांनी लक्षणे दिसून येतात. पहिली लक्षणे - ताप, डोकेदुखी आणि थंडी वाजून येणे - सौम्य असू शकतात आणि मलेरिया म्हणून ओळखणे कठीण असू शकते. २४ तासांच्या आत उपचार न केल्यास, पी. फाल्सीपेरम मलेरिया गंभीर आजारात बदलू शकतो, ज्यामुळे अनेकदा मृत्यू होऊ शकतो.

गंभीर मलेरिया असलेल्या मुलांमध्ये खालीलपैकी एक किंवा अधिक लक्षणे वारंवार दिसून येतातः तीव्र अशक्तपणा, मेटाबॉलिक ॲसिडोसिसच्या संबंधात श्वसनाचा त्रास किंवा सेरेब्रल मलेरिया.

प्रौढांमध्ये, बहु-अवयव निकामी होणे देखील वारंवार होते. मलेरियाच्या स्थानिक भागात, लोकांमध्ये आंशिक प्रतिकारशक्ती विकसित होऊ शकते, ज्यामुळे लक्षणे नसलेले संसर्ग होऊ शकतात. मलेरिया नावाचा एक परजीवी संसर्ग मादी (ॲनोफिलीस) डासांमुळे पसरतो आणि तो गंभीर, कधीकधी प्राणघातक आजार निर्माण करू शकतो. मलेरिया दरवर्षी २०० कोटी लोकांना धोका निर्माण करतो, ज्यामध्ये ९० स्थानिक देशांचे रहिवासी आणि १२.५ कोटी आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा समावेश आहे. प्लाझमोडियम परजीवी एक जटिल जीवनचक्र तयार करतात ज्यामुळे नियतकालिक ताप येतो. बहुतेक रुग्ण उपचारानंतर मलेरियाच्या लक्षणांपासून लवकर बरे होतात, परंतु उपचारांना उशीर झाल्यास गंभीर मलेरिया अशक्तपणा, सेरेब्रल मलेरिया, कोमा किंवा मृत्यू यासारख्या गंभीर गुंतागुंत होऊ शकतात.

२०२६ ची संकल्पना, " मलेरियाविरुद्ध एकजूट ", ही दरवर्षी लाखो लोकांचा बळी घेणाऱ्या या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठीच्या सहयोगी कृतीकडे एक सक्रिय बदल दर्शवते. "आरोग्य समानते"वर लक्ष केंद्रित करून, ही मोहीम सरकार



आणि आरोग्य सेवा पुरवठादारांना सर्वात असुरक्षित "अंतिम टप्प्यातील" समुदायांपर्यंत पोहोचण्याची मागणी करते, जेणेकरून भौगोलिक किंवा आर्थिक अडथळे आवश्यक निदान आणि उपचारांपासून वंचित राहणार नाहीत.

या उपक्रमाचे लक्ष्य विविध समुदाय असून, यामध्ये उच्चस्तरीय धोरणकर्त्यांपासून ते तळागाळातील समुदाय नेत्यांपर्यंत सर्वांना सहभागी करून घेतले आहे. सरकारने मलेरिया नियंत्रणाला व्यापक सार्वत्रिक आरोग्य संरक्षण आराखड्यात समाविष्ट करावे, असे आवाहन करण्यात आले आहे, तर खाजगी क्षेत्राला संशोधन आणि मनुष्यबळ संरक्षणात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले आहे. त्याचबरोबर, ही मोहीम स्थानिक आरोग्य सेवा प्रदात्यांना शैक्षणिक प्रयत्नांचे नेतृत्व करण्यासाठी आणि आघाडीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सक्षम करते. तथापि, जागतिक मलेरिया दिन २०२५ ची संकल्पना 'पुनर्गुंतवणूक करा, पुनर्कल्पना करा, पुनर्प्रज्वलन करा' (Reinvest, Reimagine, Reignite) ही होती, जी मलेरिया रोगाच्या प्रतिबंध आणि जनजागृतीवर केंद्रित होती..

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात जागतिक समुदायाने मलेरियासाठी पुन्हा वचनबद्धता दर्शविली आणि परिणामी, दोन दशकांहून अधिक काळ अंदाजे २.२ अब्ज प्रकरणे आणि १.२७ कोटी मृत्यू रोखण्यात आले आहेत. परंतु वर्षानुवर्षे सतत घट झाल्यानंतर, प्रगती थांबली आहे. आज, मलेरिया दर मिनिटाला अंदाजे १ मृत्यू घेतो, ज्यामध्ये बहुतेक मृत्यू हे आफ्रिकन प्रदेशात होतात.

पुढील प्रगती आणि दशकांपासून मिळवलेले यश धोक्यात आहे. अनेक स्थानिक देशांमध्ये अत्यंत हवामानविषयक घटना, संघर्ष, मानवतावादी आणीबाणी आणि आर्थिक ताण यामुळे मलेरिया नियंत्रण प्रयत्नांमध्ये व्यत्यय येत आहे, ज्यामुळे लाखो लोकांना या आजारापासून बचाव करण्यासाठी, शोधण्यासाठी आणि उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा मर्यादित प्रमाणात उपलब्ध होत आहेत. त्वरित उपचारांशिवाय, मलेरिया वेगाने गंभीर आजार आणि मृत्यूपर्यंत वाढू शकतो.

मलेरिया संपवण्यासाठी पुन्हा एकदा वचनबद्ध होण्याची वेळ आली आहे. या आजाराला पराभूत करण्यासाठी आपल्याकडे ज्ञान, जीवनरक्षक साधने आणि लक्ष्यित प्रतिबंध, चाचणी आणि उपचार पद्धती आहेत. आपण सिद्ध हस्तक्षेपांमध्ये पुन्हा गुंतवणूक केली पाहिजे, सध्याच्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी आपल्या धोरणांची पुनर्कल्पना केली पाहिजे आणि मलेरिया संपवण्याच्या दिशेने प्रगती वेगवान करण्यासाठी देश आणि समुदायांसह एकत्रितपणे आपले सामूहिक प्रयत्न पुन्हा सुरू केले पाहिजेत.

जागतिक मलेरिया दिनाचे महत्त्व -

मलेरिया हा जगातील सर्वात प्राणघातक परजीवी आजारांपैकी एक आहे, ज्यामध्ये २०१७ मध्ये जागतिक स्तरावर २१.९ कोटींहून अधिक रुग्ण आणि ४.३५ लाख मृत्यू झाले. या संख्येला आळा घालण्यासाठी, या आजाराबद्दल आणि त्याच्या प्रतिबंधाबद्दल जागरूकता वाढवणे आणि त्याचे प्रतिबंध करणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे, ज्यामध्ये लोकांना लवकर लक्षणे, खबरदारी आणि उपचार पर्यायांबद्दल शिक्षित करणे समाविष्ट आहे. संशोधन अभ्यासातून असे दिसून आले आहे की मलेरियाचे लवकर निदान आणि उपचार मलेरियाच्या लक्षणांबद्दल आणि त्याच्या प्रतिबंधाबद्दल जागरूकता वाढवून मृत्युदर कमी करू शकतात.

जागतिक मलेरिया दिन हा जागतिक लक्ष वेधून घेण्यासाठी आणि लोकांना बाधित होण्याचा धोका कमी करण्यासाठी मदत करण्यासाठी एक व्यासपीठ आहे. हे २०२० मध्ये स्पष्ट झाले, जिथे कोविड-१९ साथीच्या आजारामुळे, जागतिक आरोग्य संघटनेने (थकज) जागरूकता सेवांमध्ये व्यत्यय आणला, ज्यामुळे प्रति १००० लोकांमागे मलेरियाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली (२००० मध्ये ८१/१००० लोकांवरून २०१९ मध्ये ५६/१००० लोकांवरून त्यानंतर २०२० मध्ये ५९/१००० लोकांवरून). २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये मृत्युदर (मृत्यू) १२% पर्यंत वाढला आहे. जगभरात, असा अंदाज होता की २००० ते २०२० दरम्यान, १०६ लाख मलेरिया मृत्यू आणि १७० कोटी मलेरियाच्या रुग्णांना रोखण्यात आले. थकज आफ्रिकन प्रदेशात सर्वाधिक रुग्ण (८२%) आणि मृत्यू (९५%) रोखण्यात आले, त्यानंतर थकज आग्नेय आशिया प्रदेश (१०% प्रकरणे आणि २%) होता.

जागतिक मलेरिया दिनाचा इतिहास २००८ मध्ये पहिल्यांदा साजरा करण्यात आलेला जागतिक मलेरिया दिन हा आफ्रिका मलेरिया दिनापासून विकसित झाला होता, जो २००१ पासून आफ्रिकन देशांद्वारे सन्मानित केला जात होता. या स्मरणोत्सवामुळे आफ्रिकन देशांमध्ये मलेरिया रोखणे आणि त्याच्या मृत्युदर कमी करणे या उद्देशाने केलेल्या उद्दिष्टांच्या स्थितीचे मूल्यांकन करण्याची संधी मिळाली. २००७ मध्ये, जगभरातील मलेरियाच्या प्रसाराची दखल घेण्यासाठी आणि या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी जागतिक मोहिमेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक आरोग्य सभेच्या (जागतिक आरोग्य संघटनेने आयोजित केलेल्या मेळाव्या) ६० व्या सत्रात आफ्रिका मलेरिया दिनाचे नाव बदलून जागतिक मलेरिया दिन असे ठेवण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला.

**मलेरिया रोगाचा प्रतिबंध**

खालील उपाय डास चावण्याचा धोका कमी करण्यास मदत करू शकतातः

- शरीरावर २०-३५% नत्र, नत्र-डायथिल -मेटा-टोलुआमाइड कीटकनाशके लावा.
- रात्री बाहेर असताना, लांब बाह्यांचा ड्रेस आणि लांब पँट घाला.
- रात्री झोपताना पलंगावर मच्छरदाणी वापरा. झोपण्यापूर्वी, बेडरूममध्ये पायरेथ्रिन किंवा संबंधित कीटकनाशकाची फवारणी करा.
- घराच्या परिसरात कधीही पाणी साचू देऊ नका. पाण्याचे टब नेहमी झाकणाने बंद करा.

मलेरिया कसा संपवायचा हे आपल्याला माहिती आहे. आत्ताच कृती करा किंवा आपला पराभव होण्याचा धोका पत्करा. मलेरिया संपवणे ही केवळ आरोग्याची अट नाही; तर ती प्रत्येक राष्ट्राच्या अधिक न्याय्य, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे.

(साभार - इंटरनेट्)



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन चोरीला गेला तर घाबरू नका

भारतात दरवर्षी लाखो स्मार्टफोन चोरीला जातात, परंतु अनेक लोकांना त्यांचा स्मार्टफोन चोरीला गेल्यानंतर काय करावे हे माहित नसते. सायबर गुन्हेगार तुमच्या फोनचा गैरवापर करून फसवणूक, ऑनलाइन फसवणूक आणि ओळख चोरी करू शकतात.



स्मार्टफोनमध्ये बरीच वैयक्तिक आणि आर्थिक माहिती असते. स्मार्टफोन चोरल्यानंतर चोर अनेकदा बँकिंग ॲप्स, सोशल मीडिया ॲप्स, ईमेल आयडी आणि वैयक्तिक माहिती थेट ॲक्सेस करण्याचा प्रयत्न करतात. लक्षात ठेवा की जर चोरांनी सोशल मीडिया अकाउंटमध्ये प्रवेश केला किंवा पासवर्ड बदलला, तर ते त्याचा गैरवापर करू शकतात.

स्मार्टफोनची चोरी किंवा हरवणे हे कोणासाठीही चिंतेचे कारण असू शकते, परंतु अशा परिस्थितीत घाबरून न जाता, वेळीच काही आवश्यक पावले उचलणे आवश्यक आहे. जेणेकरून फोनमध्ये असलेला वैयक्तिक आणि आर्थिक डेटा सुरक्षित ठेवता येईल.

सायबर तज्ञ राहुल मिश्रा म्हणतात की, स्मार्टफोन चोरीला गेला किंवा हरवला तर घाबरून जाण्याऐवजी काही आवश्यक पावले उचलली पाहिजेत. यामुळे स्मार्टफोन परत मिळण्याची शक्यता वाढते. म्हणून, सर्वप्रथम जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करा

फोनचा IMEI नंबर

फोनचा ब्रँड आणि मॉडेल

बेपत्ता होण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण

फोन नंबर आणि सिम तपशील

ओळखपत्राची प्रत,घटनेची थोडक्यात माहिती पोलिसांना द्या यानंतर भारत सरकारच्या CEIR पोर्टलवर जा. तुमचा मोबाईल नंबर आणि IMEI नंबर देऊन डिव्हाइस ब्लॉक करा. असे केल्याने, जर कोणी तो फोन वापरण्याचा प्रयत्न केला, तर त्याची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचते. या प्रक्रियेमुळे पोलिसांना गुन्हेगारापर्यंत पोहोचणे सोपे होते आणि तुमचा फोन परत मिळण्याची शक्यता वाढते. भारत सरकारने सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर पोर्टल सुरू केले आहे. त्याच्या मदतीने, पोलिसांना चोरीला गेलेला किंवा हरवलेला मोबाईल सहज सापडतो.

# मराठी चित्रपट अभिनेते शाहू मोडक

प्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपट अभिनेते शाहू मोडक यांचा जन्म 25 एप्रिल 1918 रोजी शाहू मोडक झाला. काही कलाकार प्रसिद्धी, पैसा यांना प्राधान्य न देता, केवळ कलेसाठी जगतात. त्यातील एक शाहू मोडक होते.

शाहू मोडक यांचा पहिला चित्रपट 'श्यामसुंदर' आणि मुख्य म्हणजे पुण्यात निर्माण झालेला हा पहिला बोलपट होता. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात रौप्यमहोत्सवाचा पहिला मान 'श्यामसुंदर'ला मिळाला. मुंबईच्या 'वेस्टएन्ड' (नाझ) या चित्रपटगृहात तो सलग 27 आठवडे पडद्यावर झळकत होता. 'श्यामसुंदर'ची याशिवाय इतरही अनेक वैशिष्ट्यं होती. भारतातला तो पहिला 'बाल चित्रपट'. शिवाय मराठीसोबत त्याची हिंदी व बंगाली आवृत्तीही काढण्यात आली होती.



**निमित्त**

शाहू मोडक हे नाव घेतले की समोर संत ज्ञानेश्वर व भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमा आजही समोर येतात. जन्माने ख्रिश्चन असूनही शाहू मोडक यांनी संत ज्ञानेश्वर व भगवान श्रीकृष्ण यांच्या भूमिका उत्तमरीच्या साकारल्या. ते ज्ञानेश्वरांची भूमिका शब्दशः जगले.

कारण त्यांनी त्या भूमिकेनंतर मांसाहार वर्ज्य केला होता. त्यांनी या भूमिकांमधून केवळ अभिनयच केला नाही, तर तो सात्विक भाव त्यांच्यामध्ये होता. संत ज्ञानेश्वर, माझा मुलगा, माणूस अशा 29 चित्रपटांत त्यांनी कृष्णाची भूमिका साकारली. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीत शाहू मोडक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते.

लोक संत ज्ञानेश्वर म्हणून त्यांचेच फोटो घरी, देवघरात लावत असत, इतके त्यांच्या भूमिकेचे कौतुक झाले. 'माणूस' चित्रपटात नायकाच्या भूमिकेत शाहू मोडक, तर नायिकेच्या भूमिकेत शांता हुबळीकर होत्या. शाहू मोडक यांची नायकाच्या भूमिकेकरिता निवड झाली, तेव्हा ते पीळदार शरीरयष्टीचे नव्हते. रोजचा व्यायाम आणि खुराकाने त्यांची तब्येत मजबूत झाली, तेव्हाच चित्रीकरणाला सुरुवात झाली. शाहू मोडक यांची प्रत्यक्ष जीवनातील भूमिकाही तेवढीच तेजस्वी होती. रूपेरी पडद्यावर तर शाहूरावांनी अनेक विक्रम प्रस्थापित केलेच. माणूस, औट घटकेचा राजा, श्यामसुंदर, अमर समाधी, नरसी मेहता, झाला महार पंढरीनाथ अशा अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका


अजरामर ठरल्या. भगवान श्रीकृष्ण आणि संत ज्ञानेश्वरांची मानसिक अवस्था शाहू मोडकांमध्ये होती. म्हणून तितक्याच सहजतेने या दोन्ही भूमिका ते साकारू शकले.

अध्यात्म, तत्त्वज्ञान, ज्योतिष यांमध्ये रस असणारे शाहू मोडक व्याख्यानांद्वारे विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करत असत. शाहू मोडक यांचा ज्योतिषाचा अभ्यास चांगला होता. निर्मात्यांना चित्रपटाच्या शुभारंभासाठी व चित्रीकरणाचे मुहूर्तही ते काढून द्यायचे. शाहू मोडक आणि प्रतिभाताई जैन यांची ही

प्रेमकहाणी अद्भूत आहे. शाहू मोडक हे ख्रिश्चन, तर प्रतिभा या जैन. जैन साध्वीचे व्रत झुगारून प्रतिभाताईंनी शाहू मोडक यांच्याशी लग्न करून एक इतिहास घडविला. शाहू मोडक यांचे 11 मार्च 1993 रोजी निधन झाले.

(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सतत अतितिखट खाणे शरीरास अपायकारक

काही जण बिनधास्त कच्च्या मिरच्या चाऊन खातात. कितीही तिखट खाण्याची सवय काहींना असते. त्यांना तिखट सोसते. काहीही आवाज न करता ते मस्त लालभडक पदार्थ ही खातात. आपण भरपूर तिखट खातो या गोष्टीचा अनेकांना अभिमान वाटतो, मात्र असे अति तिखट पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. अनेक प्रकारचे शारीरिक त्रास तिखट खाल्याने होऊ शकतात. हेल्थशॉट्स तसेच क्लेवरलँण्ड क्लिनिक हेल्थसारख्या साईट्सवर उपलब्ध असलेल्या मजकूरानुसार अति मसालेदार झणझणीत पदार्थ खाल्याने पचनसंस्थेमध्ये बिघाड होऊ शकतो. विविध आजार उद्भवू शकतात. अति तिखट खाल्याने पोटातील आम्ल वाढते. त्यामुळे आम्लपित्ताचा त्रास सुरू होतो. एकदा का आम्लाचा त्रास सुरू झाला की मग सारख्या उलट्या होतात. पोटात दुखायला लागते तसेच छातीत जळजळ सुरू होते. सारखे हे त्रास सहन करावे लागतात. पचन व्यवस्थित होत नाही. पचन न झाल्याने मळमळायला लागते. मग उलट्या डोकेदुखी असे त्रासही होतात.



तिखट खाल्याने जिभेच्या सहनशीलतेवर परिणाम होतो. जिभेवर फोड येतात. सतत तोंड येते. मग तिखट काय सगळेच पदार्थ खाताना फोड झोंबतात. अति तिखट खाल्याने जिभेची कार्यक्षमताही कमी होते.

तिखट खाताना डोळ्यातून पाणी येते. तसेच भरपूर घाम फुटतो. शरीराची ती प्रतिक्रिया असते. शरीर तिखट पचवण्याचा प्रयत्न करीत असते. त्यामुळे घाम येतो. त्वचा लाल होते. तिखट खाल्याने चेहऱ्यावर पुरळ उठते, कारण तिखट पदार्थ शरीरातील उष्णता वाढवतात.

अति तिखट खाल्याने हृदयावरही परिणाम होऊ शकतो. तसेच गॅस्ट्रीक अल्सर होऊ शकतो. असे आजार फार महागात पडतात.

पाईल्सबद्दल तर सर्वांना माहिती आहे. अति तिखट खाल्याने पाईल्सचा त्रास होऊ शकतो. पाईल्स एकदा झाले की मग बसण्या-झोपण्याचेही वांदे होतात तसेच हा आजार लगेच बरा होत नाही. फार त्रासदायक ठरतो.

आतड्यांना तिखटामुळे त्रास होतो. आतड्यांसाठी अति तिखट खाणे धोकादायक ठरु शकते. विविध विकार उद्भवतात. त्यामुळे वेळीच सावध व्हा. प्रत्येक चव योग्य प्रमाणातच खावी.

# रायगडात ३६१ दाम्पत्यांचा नोंदणी विवाह

## १५० रुपयांत सुरू होते संसाराची नवी इनिंग

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भपकेबाज लग्नसमारंभ, लाखोंचा खर्च आणि दीर्घ तयारीच्या गडबडीला आता तरुणाईने पर्याय शोधला आहे. "कमी खर्च, जास्त सोय" या तत्त्वावर आधारित नोंदणी विवाहाला दिवसेंदिवस वाढती पसंती मिळत आहे.रायगडात गेल्या वर्षभरात ३६१ दाम्पत्यांनी नोंदणी विवाह केले आहेत.

ऑनलाईन सुविधेमुळे ही प्रक्रिया अधिक सोपी आणि सुलभ झाली आहे. विशेष म्हणजे, आता घरबसल्या किंवा अगदी परदेशातूनही विवाहाची नोटीस देता येत असल्याने या पद्धतीकडे युवक-युवतींचा कल झपाट्याने वाढताना दिसत आहे.

पारंपरिक लग्न म्हटले की मंगल कार्यालय, जेवणावळी, वाजंत्री, महागडे कपडे, निमंत्रणपत्रिका आणि मिरवणुकाया सर्वांचा एकत्रित खर्च मोठा असतो. यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. मात्र, या सर्व खर्चिक गोष्टींना फाटा देत आजची तरुण पिढी "नो तामझाम" पद्धतीने साध्या आणि कायदेशीर विवाहाला प्राधान्य देत आहे. केवळ काहीशे रुपयांत, अगदी सुमारे १५० रुपयांच्या खर्चात विवाह नोंदवता येत असल्याने हा पर्याय अधिक आकर्षक ठरत आहे.

रायगड जिल्ह्यातील आकडेवारीही या बदलाची साक्ष देते. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत तब्बल ३६१ जोडप्यांनी नोंदणी पद्धतीने विवाह केला आहे. ही वाढती संख्या नोंदणी विवाहाचा स्वीकार वाढत असल्याचे स्पष्ट दर्शवते. सोपी, जलद आणि किफायतशीर प्रक्रिया असल्याने अनेकजण या पर्यायाकडे वळत आहेत.

नोंदणी विवाहातून मिळणारे कायदेशीर प्रमाणपत्र हे परदेश प्रवास, व्हिसा प्रक्रिया तसेच विविध शासकीय कामांसाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे व्यवहारिक दृष्टिकोनातूनही हा पर्याय अधिक फायदेशीर मानला जात आहे.एकूणच, कमी खर्च, कमी वेळ आणि अधिक सोय यामुळे "साधं पण स्मार्ट" लग्न ही संकल्पना तरुणाईत रुजत असून, भविष्यात नोंदणी विवाहाचा ट्रेंड आणखी वेगाने वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेष विवाह कायदा १९५४ अंतर्गत ही प्रक्रिया पार पडते. इच्छुक वधू-वरांनी विवाहाची नोटीस द्यावी लागते. त्यानंतर ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यावर, कोणताही आक्षेप न आल्यास तीन साक्षीदारांच्या उपस्थितीत विवाह नोंदवला जातो. आता ऑनलाईन नोटीस देण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने कार्यालयात जाण्याच्या फेऱ्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्या आहेत.

**"नोंदणी विवाह करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. नागरिकांना एक महिना अगोदर नोटीस द्यावी लागते, मात्र ऑनलाईन सुविधेमुळे ही प्रक्रिया अधिक सोयीस्कर झाली आहे. घरबसल्या ही सेवा उपलब्ध असल्याने नागरिकांनी याचा लाभ घ्यावा."**

**-रविराज सुपेकर, दुय्यम निबंधक तथा विवाह अधिकारी**

# खालापूर तालुक्यात खत टंचाईचा प्रश्न उद्भवणार नाही

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना आगामी हंगामात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने व्यापक नियोजन केले आहे. शासनाकडून रायगड जिल्ह्यासाठी एकूण १४,००० मेट्रिक टन रासायनिक खताचे वाटप प्राप्त झाले असून एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत नियोजित साठ्यानुसार खत विक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे.

हंगामाच्या काळात खतांची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी तालुक्याला ३५३ मेट्रिक टनांचा संरक्षित साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. या नियोजनामुळे तालुक्यात आवश्यकतेनुसार अनुदानित खते उपलब्ध राहतील आणि शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, अनुदानित युरियाचा शेतीव्यतिरिक्त इतर कारणांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी कृषी विभागाने तपासणी मोहीम हाती घेतली आहे. औद्योगिक वापरासाठी युरिया वापरणाऱ्या कंपन्यांची विशेष तपासणी करण्यात येत आहे.ही तपासणी मोहीम पुढेही नियमितपणे सुरू राहणार असून, अनधिकृत साठा किंवा गैरवापर आढळल्यास संबंधित कंपन्यांवर रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

जिल्ह्यात उपलब्ध असलेले मंजूर वाटप आणि साठा लक्षात घेता खतांची टंचाई निर्माण होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाईघाईने खत खरेदी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच कुठेही खत विक्रीत 'लिंकिंग' करून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्यास तात्काळ कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) तसेच इतर कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा,

# आरटीई प्रवेश निश्चितीसाठी मुदतवाढ मिळाल्याने पालकांना दिलासा

**अलिबाग : प्रतिनिधी**



बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९नुसार दुर्बल व वंचित घटकाकरीता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश सन २०२६-२७ प्रक्रियेदरम्यान सोडतद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणी व आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी गुरुवार (ता.३०) पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांची कागदपत्रे तातडीने पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातर्फे करण्यात आले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा या शाळांमध्ये आरटीई २५ टक्के सन २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी नावनोंदणी झाल्यानंतर सोडत प्रक्रिया राबविण्यात आली होती. या सोडतीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आपल्या कागदपत्रांची पडताळणी करण्याठी व आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी २० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र आता ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ज्या पालकांनी आपल्या पाल्याचे कागदपत्रे पडताळणी करून आपल्या पसंतीच्या शाळेमध्ये पाल्याचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांनी केले आहे.

# रणरणत्या उन्हात निर्माण होणाऱ्या वावटळ , धुळीचे भोवरे ठरत आहेत अपघातांचे केंद्रबिंदु

**खोपोली : प्रतिनिधी**



उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून दुपारच्या वेळेस प्रचंड उकाडा जाणवत आहे. या रणरणत्या उन्हामुळे परिसरात वारंवार वावटळी (धुळीचे भोवरे) निर्माण होत असून अपघातांचे केंद्रबिंदू ठरत आहेत. त्यामुळे शेतकरी, मजूर आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दुपारच्या सुमारास अचानक उठणाऱ्या या वावटळींमुळे शेतातील मोकळी माती उडून मोठ्या प्रमाणात धुळीचे भोवरे तयार होतात.हे भोवरे काही क्षणांतच तीव्र रूप धारण करून आसपासच्या परिसरात पसरतात. परिणामी, शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना मोठा धोका निर्माण होत आहे.

शेतातील कामांदरम्यान अचानक येणाऱ्या वावटळींमुळे अनेकांना तोल जाऊन पडण्याच्या घटना घडत आहेत.

काही ठिकाणी शेतीसाठी वापरण्यात येणारी हलकी साधने, प्लास्टिक साहित्य किंवा टिनचे डबे हवेत उडून अपघात घडवत आहेत. तसेच, धुळीच्या तीव्र झोतामुळे काही वेळेस दृष्टी कमी होत असल्याने दुचाकीस्वार आणि वाहनचालकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# रेवदंडा किल्ल्यावर विद्यार्थ्यांचा स्वच्छता अभियानाचा आदर्श उपक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**



ऐतिहासिक वारसा जपण्याच्या दृष्टीने जिंदल विद्या मंदिर, साळाव येथील विद्यार्थ्यांनी रेवदंडा किल्ल्यावर स्वच्छता अभियान राबवून एक प्रेरणादायी आदर्श घालून दिला. इयत्ता ९वी 'अ' च्या ३१ विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्याच्या परिसराची स्वच्छता करून त्याचे सौंदर्य पुनर्स्थापित करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला.

या उपक्रमात शिक्षिका श्रीमती अफी बाशा आणि सुशील अभंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेचे शिपाई राकेश पाटील यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी किल्ल्याभोवती साचलेला कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला आणि "स्वच्छता हीच सेवा" हा संदेश प्रभावीपणे दिला.

शाळेचे प्राचार्य . मुकेश ठाकूर सर आणि उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष . पंकज मलिक सर यांनी अशा सामाजिक व ऐतिहासिक जतनाच्या उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

तसेच JET प्रमुख डॉ. भावेश भालेराव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, "इतिहासाचे जतन हे केवळ शासनाचे नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी केलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असून भावी पिढीसाठी आदर्श निर्माण करणारा आहे."

या स्वच्छता मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारशाबद्दल जाणीव निर्माण झाली असून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वही त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून अनुभवले. जिंदल विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी यावेळी किल्ल्याच्या परिसरातील स्वच्छता करून त्याची योग्य ती विल्हेवाट करण्यात आली.



**मुरुड : कोळीवाडयात कोळी बांधव आपल्या बोटी किनारी आणून शाकारण्याच्या तयारीत आहेत. खराब हवामानामुळे मासे मिळत नसल्याने लवकरच मासेमारी बंद होणार आहे . ही पाऊस लवकर असल्याने ती तयारी सुरू झाली आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# ४ मे रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**अलिबाग**,: जिल्हास्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन साजरा होतो. माहे मे २०२६ चा लोकशाही दिन सोमवार दि.४ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १.०० वा. जिल्हाधिकारी कार्याकायच्या राजस्व सभागृहात आयोजित केला आहे. लोकशाही दिनाकरिता नागरिकांनी प्रथम तालुका लोकशाही दिनात अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. उत्तराने समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्ज करु शकतात,

# खोपोली बायपास बोगद्यात डंपर कोसळून कामगार ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली बायपास बोगद्वायात डांबर वाहतूक करणारा डम्पर ब्रेक निकामी झाल्याने पलटी झाला. या अपघातात बोगद्यामधे साफसफाई काम करणाऱ्या कामगारावर डम्पर कोसळल्याने जागीच ठार झाला. तर. वाहनाच्या सहाय्यक (क्लीनर) जखमी झाला. ठार झालेल्या कामगार व क्लिनर यांची नावे अद्याप समजू शकली नाहीत. घटनास्थळी बोरघाट महामार्ग वाहतूक पोलीस बोरघाटचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन जखमी क्लिनर ला रुग्णालयात दाखल केले. ही घटना दुपारी ३.३० वा सुमारास घडली. डम्पर खोपोलीत जुन्या महामार्गाने उतरत असताना हा अपघात घडला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे तुरमाळे तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **१. श्री जयदीप नारायण कांबळे २. श्रीमती मनिषा विजय जाधव उर्फ विना विजय जाधव,** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे तुरमाळे,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | |
| १३०/५ | ०-०६-०० | ०-००-० | ०-०६-०० | १.०६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१४** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०४/२०२६

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. संपर्कः- ८८८८२७१७५९


# जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुहाची व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल

मुरुड-जंजिरा या तालुक्यातील कोर्लई ग्रामपंचायत हद्दीतील १० महिला एकत्र येऊन दि.०९ जून २०१८ रोजी जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुहाची स्थापना केली. महिलांच्या एकत्रिकरणाने त्यांच्यामधील एकत्रितपणाची भावना वाढत गेली.

सुरुवातीच्या काळात या समुहामध्ये फक्त मासिक वर्गणी जमा करणे व जमा केलेली वर्गणी गटातील सदस्यांना गरज पडत असल्यास अंतर्गत कर्ज म्हणून देणे हे काम केले. या समुहाने स्वच्छ अभियान पोषण महासप्ताह व कोविड-१९ अशा कार्यक्रमामध्ये भाग घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्याचेही काम केले आहे.

कोर्लई ग्रामपंचायतीमध्ये गावातील सर्व महिलांची सभा घेण्यात आली या सभेत जय मल्हार महिला स्वयंसहायता समुहाचा उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये समावेश करण्यात आला.

या सभेत सर्व महिलांना अभियानाचे महत्व, योजना, दशसुत्री या सर्वांची माहिती देण्यात आली. त्यानंतर अभियानांतर्गत जय मल्हार महिला स्वयंसहायता समूहाची MIS ऑनलाईन प्रक्रिया करण्यात आली. जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुहाने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाकडुन फॉर्म भरुन रक्कम रु.१५०००/- फिरता निधीचा लाभ घेतला. तसेच जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुह हा एकता महिला ग्रामसंघास २०१९ मध्ये जोडला गेला आहे.

जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुहाने अभियाना मार्फत बँक कर्जासाठी फॉर्म भरुन सन-२०१९ मध्ये पहिले रक्कम रु. १,००,०००/- एवढे बँकेकडून कर्ज प्राप्त करुन घेतले. यामधून महिलांनी पुरणपोळी बनविणे व चिकी व्यवसाय सुरु करुन समुहाला व आपल्या कुटूंबाला आर्थिक मदतीचा लावण्याचे ठरविले.

जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुहाने व्यवसाय करण्याचे ध्येय ठेवून पुरणपोळी बनविणे व चिकी व्यवसाय करण्यावर समुहातील महिलांनी भर दिला. कारण कोर्लई हे गाव समुद्राच्या बाजुला वसलेले असल्याकारणाने व कोर्लई किल्ला हे पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र असल्याने जय मल्हार महिला स्वयंसहाय्यता समुहाने पुरण पोळी व्यवसाय करण्याचे ठरविले.

तसेच जवळच्या गावात घरपोच पुरण पोळी नेऊन देणे तसेच गावातील विविध कार्यक्रम समारंभांना पुरण पोळी पोहचविण्याचे कार्य जय मल्हार समुह करीत आहे.

जय मल्हार महिला स्वयंमसहाय्यता समुह हा नेहमी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व त्यांच्या यंत्रणेचा ऋणी आहे. कारण अभियानाच्या हातभाराने समुह आपले यश प्राप्त करु शकला आहे.

समुहातील महिलांची एकतत्रितपणा, एकमेकांना हातभार लावणे. महिलां मधील व्यावसाय करण्याची चिकाटी, तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या यंत्रणने दिलेला हातभार यामुळे या समुहाने आपले यश संपादन केले आहे.

**श्रीमती संजीवनी जाधव सहायक संचालक, विमाका, नवी मुंबई**


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E–TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | Tender No. EE/EHV(O&M)/ DIVN/MHD/Tech/ E-Tender No.12 / 2026-27 Dt. 25.04.2026 RFx No. 7000039736 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring LMV Jeep Type (i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, Mahindra Marazzo, TATA Sumo Gold or similar type (07 seater passing) etc) services along with fuel and driver at 220 kV Vilebahgad Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2026-27. | Rs. 5,10,571/- (including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. **Bid submission is from 25.04.2026 @ 00:00 hrs 09.05.2026 @23:59 Hrs** for above tender for further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**

# नवी मुंबईत सिडको आणि मनपाने अधिकृत डम्पिंग व्यवस्था उभारावी

## सजग नागरिक मंचची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात वाढत्या अनधिकृत डेब्रिज डम्पिंगच्या पार्श्वभूमीवर सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेला एकात्मिक डेब्रिज व्यवस्थापन प्रणाली निर्माण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी सजग नागरिक मंचाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. डेब्रिज वाहने पकडण्याच्या कारवाया सुरू असल्या तरी अधिकृत पर्याय नसल्याने समस्या कायम राहात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नवी मुंबईत पुनर्विकास, रस्ते सिमेंटीकरण आणि विविध पायाभूत सुविधा कामांमधून मोठ्या प्रमाणात बांधकामातील डेब्रिज निर्माण होत आहे, मात्र या डेब्रिजच्या विल्हेवाटीसाठी अधिकृत डम्पिंग साइट्स, प्रक्रिया केंद्र किंवा पारदर्शक शुल्क प्रणाली नसल्याने डेब्रिज धारकांना अनधिकृत मार्गाचा अवलंब करावा लागत असल्याचे मंचाने म्हटले आहे. परिणामी खाडी किनारे, नाले, मोकळे भूखंड आणि डोंगर पायथ्यांवर बेकायदेशीर डम्पिंग वाढत असून पर्यावरणीय हानीचा धोका निर्माण झाला आहे.



केंद्र सरकारच्या Construction & Demolition Waste Management Rules, २०१६ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी डेब्रिज संकलन, वाहतूक व प्रक्रिया केंद्र उभारणे बंधनकारक आहे.

सजग नागरिक मंचाने अधिकृत डम्पिंग साइट्स निश्चित करणे, संयुक्त C&D Waste धोरण तयार करणे, डेब्रिज वाहतुकीसाठी ऑनलाईन पास प्रणाली सुरू करणे, शहर प्रवेश बिंदूंवर तपासणी चौक्या उभारणे, अधिकृत शुल्क व पावती प्रणाली लागू करणे, तसेच डेब्रिज पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्र उभारण्याची मागणी केली आहे.

नवी मुंबईला अनधिकृत डम्पिंगमुक्त करण्यासाठी नगरविकास विभागामार्फत सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेला कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे.

**मंचच्या प्रमुख मागण्या :**

१. नवी मुंबईत किमान ४ ते ५ अधिकृत डम्पिंग साइट्स तातडीने निश्चित कराव्यात.
२. डेब्रिज वाहतुकीसाठी 'जीपीएस ट्रॅकिंग' आणि 'ऑनलाईन पास प्रणाली' सुरू करावी.
३. शहराच्या प्रवेशद्वारांवर नोंदणी चौक्या उभारून अवैध वाहतुकीवर लक्ष ठेवावे.
४. जुन्या कामांतून निघणाऱ्या डेब्रिजवर प्रक्रिया करण्यासाठी 'रिसायकलिंग प्लांट' उभारावा.
५. सामान्य नागरिकांसाठी 'डेब्रिज ऑन कॉल' ही संकलन व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

**अधिकृत पर्याय उपलब्ध करून देणे हाच या समस्येवरील प्रभावी उपाय आहे. 'हे करू नका' बरोबर 'हे करा' अशी व्यवस्था उभारणे हीच खरी प्रशासनाची जबाबदारी आहे. अधिकृत डम्पिंग साइट्स आणि पारदर्शक प्रणालीशिवाय डेब्रिज माफियांना आळा बसणार नाही.**

**–डॉ. विशाल माने,**
प्रशासकीय सल्लागार,
सजग नागरिक मंच, नवी मुंबई

# वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा प्रकल्पास राज्यस्तरीय द्वितीय पारितोषिक

**नवी मुंबई : बातमीदार**

'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा' यामध्ये 'सर्वोत्कृष्ट कल्पना / उपक्रम' कॅटेगरीमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या 'थ्रेड्स ऑफ चेंज' या अभिनव उपक्रमास 'राज्यस्तरीय व्दितीय' क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले असून त्याबद्दल महापौर श्रीम. सुजाता पाटील यांनी एप्रिल महिन्याच्या सर्वसाधारण सभेत अभिनंदन केले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, उद्यान विभागाच्या उपआयुक्त श्रीम.स्मिता काळे यांनी सादर केलेल्या 'वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा (TRF)' प्रकल्पास हा बहुमान प्राप्त झाला असून कापडी कच–याला नवे रूप देऊन कचरा कमी करणा–या व स्वच्छतेला नवा आयाम देणा–या या पर्यावरणपूरक प्रकल्पाची नोंद सर्व स्तरावर कौतुकाने घेतली जात आहे.

केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयाच्या वस्त्र समितीमार्फत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सीबीडी बेलापूर सेक्टर १ येथे हे वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा (टीआरएफ) केंद्र सुरू असून यामध्ये एसबीआय फाऊंडेशन, टिसर आर्टिसन्स ट्रस्ट, आयडीएच इंडिया या संस्थांचा सहयोग आहे. या अंतर्गत वस्त्र कचरा संकलनासाठी १०० हून अधिक सोसायट्यांमध्ये वापरल्यानंतर टाकून दिले जाणारे सुस्थितीतील कपडे पुनर्प्रक्रियेकरिता देण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या वस्त्र संकलन पेट्या ठेवण्यात आलेल्या आहेत. त्याठिकाणी संकलित वस्त्रांची नोंद करण्याकरिता लॉगबुक ठेवण्यात आलेले आहे व सोसायटीनिहाय पेट्या टॅगींग करण्यात आलेल्या आहे.



सदर कपडे संकलित करून टीआरएफ केंद्रात आणण्यासाठी टिपर वाहन उपलब्ध करून देण्यात आलेले असून केंद्राच्या ठिकाणी वाहनातून आणलेल्या कपड्यांचे त्यांच्या प्रतवारीनुसार वर्गीकरण करण्यात येते. त्याचप्रमाणे तेथे कोशा स्कॅनरव्दारे कापूस, पॉलिस्टर, रेशीम अशा वेगवेगळ्या प्रकारच्या कपड्यांचे वर्गीकरणही केले जाते. त्यानंतर त्या वस्त्रांवर त्यांच्या गुणवत्तेनुसार योग्य प्रक्रिया केली जाते.

ऑगस्ट २०२५ पासून आत्तापर्यंत वापरानंतरच्या वस्त्राचा ४१,५०० किलो कचरा याठिकाणी आणण्यात आला असून त्यावर पुनर्प्रक्रिया करून त्यापासून ४०० हून अधिक उत्पादने तयार करण्यात आलेली आहेत. याविषयीच्या जनजागृतीसाठी ७५ कार्यशाळा घेण्यात आलेल्या असून ११५०० हून अधिक कुटुंबे या उपक्रमाशी जोडली गेलेली आहेत.

विशेष म्हणजे टीआरएफ केंद्रामध्ये विविध प्रकारच्या कापडी वस्तू व साहित्य निर्मितीसाठी ३०० हून अधिक महिलांना कौशल्य विकासात्मक प्रशिक्षण देण्यात आलेले असून १५० हून अधिक महिलांना प्रतिमहिना ९ ते १५ हजार इतका रोजगार उपलब्ध झालेला आहे.

इतरांनाही असा प्रकल्प राबविता यावा यादृष्टीने या प्रकल्पातील प्रक्रियेची मानक कार्यप्रणाली तयार करण्यात आलेली असून हा प्रकल्प 'स्वच्छ भारत मिशन' आणि 'शाश्वत विकास' ही उद्दिष्टे साध्य करणारा आहे. वापरानंतरच्या वस्त्र कच–याचे प्रमाण सर्वत्र मोठे असून सध्या फॅशनच्या बदलत्या ट्रेंडमुळे ते सातत्याने वाढते आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारची वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिका एकत्रितपणे राबवित असलेला हा प्रकल्प नागरी घनकचरा व्यवस्थापन, चक्रीय अर्थव्यवस्थेला चालना आणि महिला सक्षमीकरण या तिन्ही धोरणात्मक उद्दिष्टांची एकत्रित अंमलबजावणी करणारा महानगरपालिका स्तरीय देशातील पहिला प्रकल्प आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या अभिनव प्रकल्पाचे कौतुक केलेले आहे.

या राज्यस्तरीय पुरस्काराने नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. आगामी काळात या बहुउपयोगी प्रकल्पाचा विस्तार करण्यात येणार आहे.

# बेलापूरमध्ये गावदेवी प्रीमियर लीग रंगली : श्री वॉरियर्स संघ विजेता

**नवी मुंबई : बातमीदार**

पारंपरिक सणासोबत क्रीडाप्रेमाची सांगड घालत अक्षय्य तृतीयेनिमित्त बेलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या गावदेवी प्रीमियर लीगमुळे परिसरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या स्पर्धेला स्थानिक युवक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




प्रकाशझोतात रंगलेल्या या स्पर्धेत एकूण चार संघांनी सहभाग घेतला होता. यात श्री वॉरियर्स, येंजल स्ट्राइकर्स, राइझिंग टाइटन आणि आयुष चॅलेंजर अशा संघांचा समावेश होता. सर्व संघांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत श्री वॉरियर्स संघाने विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेतील वैयक्तिक कामगिरीसाठीही काही खेळाडूंना गौरविण्यात आले. यात मालिकावीरचा किताब दैविक कोळी याला मिळाला. उत्कृष्ट फलंदाज कुंजन कोळी, उत्कृष्ट गोलंदाज विराज कोळी, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून मयंक नाईक याची निवड करण्यात आली.


गावदेवी मित्र मंडळाच्या या उपक्रमामुळे तरुणांना व्यासपीठ मिळाले असून क्रीडा संस्कृतीला चालना मिळाल्याचे रवि कोळी यांनी यावेळी सांगितले. या स्पर्धेला केशव कोळी, दिनेश गझने, मयंक नाईक, श्रीकांत कोळी, गणेश गझने, भूषण कोळी, गणेश बोस, सोमनाथ कोळी आदी उपस्थित होते.

# कर्नाटक व अन्य प्रांतातील आंब्याला त्यांच्या राज्याचे लेबल लावण्याच्या सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्नाटक व अन्य प्रांतातील आंब्याला त्यांच्या राज्याचे लेबल लावूनच त्याची विक्री करा. अशा सूचना बाजार समितीच्या वतीने बाजारातील घाऊक व्यापाऱ्यांना केल्या आहेत. महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघटनेच्या वतीने बाजार समिती कडे अशी मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार बाजार समितीने व्यापाऱ्यांना या सूचना दिल्या आहेत.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये मागील काही वर्षे कोकण हापूसला साधर्म्य असलेला आंबा कर्नाटक, केरळ राज्यातून मोठ्या प्रमाणात येत आहे. याचा परिणाम कोकण हापूस वर होत आहे. कोकण हापूसच्या



नावाने हा आंबा एपीएमसी मध्ये घाऊक आणि किरकोळ स्वरुपात विकला जात आहे. हा आंबा चवीला निकृष्ट दर्जाचा आहे. कोकण हापूस अविट गोडीचा व उच्च दर्जाचा आहे. त्यामुळे त्याचा तुलनेने इतर जातीच्या आंब्याला चव लागत नाही. यामुळे ग्राहकाची फसवणूक होते. आंध्र, केरळ या प्रांतातील आंबा दर कमी असतो. त्या मानाने हापूस आंब्याचे दर जास्त असतात. आणि हा हापूस आंबा पेटी मध्ये डझनवर विकला जातो. तर कर्नाटक आंबा किलो ने विकला जातो. त्यामुळे तो स्वस्त विकला जातो. हा आंबा घरी नेल्यानंतर खाण्यासाठी कापल्यानंतर कोकण हापूसच्या दिसतो, मात्र कोकणाच्या हापूस ची चव याला येत नाही. या सर्वांचा परिणाम कोकण हापूस वर होतो. असे आंबा उत्पादक संघाचे म्हणणे आहे.

एपीएमसी मध्ये कर्नाटक व अन्य प्रांतातील आंबा वेगळा ठेवावा व त्यावर त्या राज्याचे नाव असलेले लेवल लावण्यात यावेत. व ग्राहकांची फसवणूक थांबवावी अशी विनंती आंबा उत्पादक संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

# ज्ञानभारत प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहीम

## मोबाईल ॲपद्वारे नोंदणीची सुविधा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतातील समृद्ध हस्तलिखित वारशाचे संवर्धन, दस्तऐवजीकरण व डिजिटायझेशन करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने 'ज्ञानभारत (Gyan Bharatam)' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहीम दि. १६ मार्च २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. देशभर विखुरलेल्या हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी, जतन व प्रसार करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहोर करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत देशातील शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) तयार करून त्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसारण करण्याचा या योजनेचा हेतू आहे. हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था किंवा संग्राहक यांच्याकडेच राहणार असून आवश्यकतेनुसार त्यांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर व भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे ही क्लस्टर केंद्रे तर आनंद आश्रम, पुणे आणि भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे ही स्वतंत्र केंद्रे म्हणून कार्यरत राहणार आहेत. राज्यासाठी पुस्तकालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राज्य नोडल संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. मुजिबकुमार जंगले, संचालक, पुस्तकालय संचालनालय कार्य पाहत आहेत. तसेच श्रीमती अंजली सोमक, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था या सहनोडल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेसाठी 'Gyan Bharatam' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांची नोंदणी, क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. हे मोबाईल ॲप Android व iOS या दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून नागरिकांना www.gyanbharatam.com या संकेतस्थळावरूनही माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक (User Manual) देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

जिल्हास्तरावर जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. या मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित तसेच NCC, NSS स्वयंसेवक व विद्यार्थी यांच्या सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. आपल्याकडे कोणतीही हस्तलिखिते उपलब्ध असल्यास त्यांची माहिती 'Gyan Bharatam या मोबाईल ॲपद्वारे अपलोड करून या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन अपर आयुक्त (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ५८ वर्षे निवृत्ती वयोमर्यादेवर आयुक्त ठाम

## शासन निर्णयाच्या अधीन राहून सेवेत कायम ठेवण्याचा पालिकेत ठराव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सेवा विनियम २०२६ व कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वयोमर्यादेच्या मुद्द्यावर राज्य शासनाने ठराव निलंबित केल्यानंतरही कर्मचाऱ्यांना सेवेत ठेवावे की विद्यमान ५८ वर्षांची वयोमर्यादा लागू ठेवावी, यावरून आयुक्त डॉ. कैलास शिंदे व सत्ताधारी समोरासमोर आले. मात्र डॉ. शिंदे यांनी यावेळी कायद्याच्या चौकटीत ५८ वर्षांची वयोमर्यादा लागू असल्याची भूमिका पुन्हा ठामपणे मांडली.

महापालिकेच्या स्थायी समितीने ११ मार्च २०२६ रोजी 'सेवा विनियम, २०२६' मंजूर केले होते, तर २० मार्चच्या महासभेत त्याला बहुमताने मान्यता देण्यात आली होती. या विनियमांनुसार निवृत्ती वय ५८ वरून ६० वर्षे करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, ३१ मार्च रोजी राज्याच्या नगरविकास विभागाने हा ठराव निलंबित करत अंमलबजावणी रोखली. या पार्श्वभूमीवर सभागृह नेते सागर नाईक यांनी गुरुवारी आयुक्तांनी निर्गमित केलेले सेवामुक्ती आदेश रद्द करून



संबंधित कर्मचाऱ्यांना शासनाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवेत कायम ठेवण्याचा ठराव मांडला. चर्चेदरम्यान आयुक्तांनी शासनाला पाठवलेले पत्र व सेवा विनियमांना आवश्यक शासन मान्यतेवरून सभागृहात तीव्र वाद झाला. सत्ताधारी सदस्यांनी, महापालिकेच्या वतीनेच शासनाकडे प्रस्ताव पाठवणे अपेक्षित असताना आयुक्तांनी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केल्याचा आक्षेप घेतला.

महापालिका ही स्वतंत्र संस्था असून आयुक्त म्हणजे महापालिका नाही, असे स्पष्ट करत, मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याचा अधिकार आयुक्तांना नसल्याचा दावा सभागृह नेते सागर नाईक यांनी केला. यावेळी सागर नाईक यांनी संबंधित ठराव शासनाने नामंजूर न करता निलंबित केल्याचे नमूद करत आयुक्तांनी पाठवलेल्या पत्रातील कारणांमुळेच हा निर्णय निलंबित झाल्याचा आरोप केला. महासभेत शिंदे गटाचे नगरसेवक किशोर पाटकर यांनी ठरावांच्या इतिवृत्तांवरून प्रशासनाला जाब विचारला. सभेचे इतिवृत्त दिले गेले नसताना ठरावांची अंमलबजावणी कशी, असा सवाल त्यांनी केला.

दीर्घ चर्चेनंतर ठराव मतदानास ठेवण्यात आला. ठरावाच्या बाजूने ५६ मते पडली, तर विरोधात ३४ मते पडली; तर मनसे १ व शिवसेना (ठाकरे) २ असे तीन सदस्य तटस्थ राहिले.

सेवा विनियम ठराव बहुमताने मंजूर झाला असला तरी त्याच्या अंमलबजावणी, शासन मान्यता आणि अधिकारांच्या व्याख्येवरून प्रशासन व सत्ताधारी यांच्यातील संघर्ष उघड झाला असून, पुढील निर्णय शासन आणि न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून राहील.

# नागरी सुविधा भूखंड हस्तांतरित करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिवुड परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी माजी खासदार संजीव नाईक यांच्या माध्यमातून सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांची भेट घेऊन नागरी सुविधा भूखंड नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी माजी नगरसेवक विशाल डोळस यांच्याकडून करण्यात आली. तसे पत्र सिडको संचालकांना डोळस यांच्याकडून देण्यात आले.

यावेळी सिवुड विभागातील विकासासाठी गेल्या १० वर्षांत केलेला पाठपुरावा, रखडलेले प्रकल्प याविषयी डोळस यांनी सिडको संचालकांशी चर्चा केली. या बैठकीत स्थानिक नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन व्यायामशाळा, महिला सक्षमीकरण केंद्र, सांस्कृतिक भवन तसेच झुणका भाकर केंद्र उभारण्यासाठी सदर भूखंड उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

सिडको व्यवस्थापकीय संचालकांनी विषयाची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्तावाचा लवकरच विचार करण्याचे आश्वासन दिले. इतरही विविध मुद्द्यांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# शिक्षकांच्या सामूहिक नृत्य स्पर्धेत सीकेटी विद्यालयाचा द्वितीय क्रमांक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे व टी एन घरत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर विद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त २२ एप्रिल रोजी संस्थांतर्गत कार्याध्यक्ष रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारित शिक्षकांच्या सामूहिक नृत्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत संस्थेतील नऊ समूहनृत्य स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यातून नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास (सीकेटी) द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. संस्थेचे सदस्य राहुल घरत यांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या समूह नृत्यात सीकेटी ज्युनिअर कॉलेज मधील सहशिक्षिका पल्लवी दिवेकर, रोशनी परदेशी, अपर्णा मुकणे, ज्योती वाघ, ऋतुजा शेंडे, माधवी बेंडकुले, तृप्ती जोशी, प्रतिमा पडवळ, कौशल्या मोमिनगिरे, आरती खुसपे, हर्षदा लोखंडे, वैशाली वाडकर, प्रतीक्षा सांगोळे, तसेच अभिनयात माधुरी पाटील, शितल पाटील, सविता सावंत, अंजली कुलकर्णी, उजमा कच्छी, योगिता जोरी, तुकाराम मोरबाळे, महेंद्र बैकर या शिक्षकांनी सहभाग घेतला. या समूह नृत्यास कोरिओग्राफर विशाल भालेराव यांनी मार्गदर्शन केले.

समूहनृत्य स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, अध्यक्ष अरुण शेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवावा -जिल्हाधिकारी

**रायगड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, भारतीय तटरक्षक दलाचे अभिषेक कुमार, आपत्ती व्यवस्थापन अधिकार सागर पाठक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले, पावसाळा सुरु होण्याकरिता एक महिन्याचा कालावधी बाकी असून सर्व शासकीय



यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. आपत्ती काळात आपदामित्रांचे सहकार्य खूप महत्वाचे असून ते तात्काळ मदतीला धावून येवून महत्वाची भूमिका बजावत असतात. याकरिता आपदा मित्र हे रायगड जिल्ह्याला लाभलेले एक वरदानच आहे. प्रत्येक विभागांनी आपला नियंत्रण कक्ष २४x७ कार्यान्वित ठेवावा. याकरिता एक समन्वयक अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. जलसंपदा विभागाने आपल्या अखत्यारित असलेली धरणे, मध्यम प्रकल्पांची तपासणी करावी. आरोग्य विभागाने प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेशा औषधसाठा, व्हॅक्शीन उपलब्ध ठेवाव्यात. आपत्तीकाळात रोगराई पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. विविध विभागांचे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापन आराखडे जिल्हा प्रशासनास पाठविण्यात यावेत. तसेच रायगड पाटबंधारे विभागाने धरणांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अतिवृष्टी विचारात घेवून टप्प्या-टप्प्याने धरणांतून विसर्ग करावा अशा सूचनाही श्री.जावळे यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, तसेच या काळात पूर्व परवानगी शिवाय कुणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश ही त्यांनी यावेळी दिले. दरड प्रवण गावांकरिता नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी गावातील लोकांच्या संपर्कात राहिले पाहिजे. आम्ही तुम्ही एक आहोत या भावनेने सर्वांनी काम करावे. आपणास काही मदत हवी असल्यास याकरिता आम्ही सदैव तत्पर आहोत अशी ग्वाही त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली.

# लोणेरे हत्याकांडातील आरोपी अद्यापही फरार; आज जनआक्रोश मोर्चा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील 'ओमकार रेसिडेन्सी' लॉजमध्ये घडलेल्या २२ वर्षीय तरुणी वरील अत्याचार व निर्घृण हत्येप्रकरणी संपूर्ण रायगड जिल्ह्यात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. या घटनेला चार दिवस उलटूनही आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

त्यामुळे या तपासात आणखी वेळ न घालवता तात्काळ सीआयडी, सीबीआय किंवा एसआयटी कडे सोपवून तपास करावा अशी मागणी आता जन आक्रोश मोर्चात करण्यात येणार आहे. अन्यथा जनतेचा अविश्वास आणखी वाढू शकतो आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. गोरेगाव पोलीस तसेच फॉरेन्सिक पथका कडून तपास सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात आरोपीला शोधण्यात अपयश आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे "आरोपी अजूनही का सापडत नाही?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या हत्या प्रकरणी पोलिसांच्या तपासाच्या गतीवर आणि कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्रशासनाची निष्क्रियता आहे की या प्रकरणात काही राजकीय हस्तक्षेप आहे, अशी शंका नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाबाबत अधिकृत माहिती देण्यास पोलीस टाळाटाळ करत असून "तपास सुरू आहे" या पलीकडे कोणतीही ठोस माहिती माध्यमांना दिली जात नसल्याने संभ्रम अधिकच वाढला आहे.

दरम्यान, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर आरोपीला अटक झाल्याचा दावा केल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. मात्र, पोलिसांनी या दाव्याला कोणताही अधिकृत दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे प्रशासन आणि राजकीय स्तरावरील माहितीमध्ये विसंगती दिसून येत असून "नेमकं सत्य काय?" असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक आणि माध्यमांकडून विचारला जात आहे. तपासात जाणीवपूर्वक माहिती लपवली जात आहे का, खरा आरोपी अद्याप मोकाट फिरत आहे का, त्याला राजकीय संरक्षण दिले जात आहे का, अशा विविध शंकांनी जनतेत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षका कडून तसेच गृहखात्या कडून या प्रकरणात तत्काळ हस्तक्षेप व्हावा, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे. या घटनेच्या निषेधार्थ सर्वपक्षीय नेते, विविध सामाजिक संघटना आणि नागरिक रस्त्यावर येत्या २५ एप्रिल रोजी जन आक्रोश मोर्चा शांततेत काढण्यात येणार असून या घटनेच्या निषेधार्थ लोणेरे गोरेगाव बंद पाळण्यात येणार असल्याचे समजते. लोणेरे गोरेगाव परिसरात सध्या भीती आणि संताप यांचे मिश्र वातावरण असून प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून आरोपीला अटक करावी, अशी एकमुखी मागणी जोर धरत आहे.

या प्रकरणाचा तपास तात्काळ वरिष्ठ पातळीवरील स्वतंत्र यंत्रणेकडे सीआयडी, एसआयटी किंवा आवश्यक असल्यास सीबीआयकडे सोपवावा, यामुळे तपासाची पारदर्शकता वाढेल आणि नागरिकांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल. तसेच आरोपीला लवकरात लवकर अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणे करून समाजात कायद्याचा धाक कायम राहील.

या घटनेच्या निषेधार्थ व पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी येत्या २५ एप्रिलला लोणेरे गोरेगाव सर्वपक्षीय बंद ठेवणार आहेत. या प्रकरणी संबंधित आरोपीला तात्काळ अटक करावे आणि पीडित कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे

# माणगाव नगरपंचायत स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादीचे विठोबा पालकर

**माणगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण रायगड जिल्ह्यात महत्वपूर्ण अशा ओळखल्या जाणाऱ्या माणगाव नगरपंचायतीच्या स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते विठोबा सिताराम पालकर यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांचे सर्व स्तरांतुन अभिनंदन होत आहे.



माणगाव नगरपंचायतीवर सध्यस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एक हाती सत्ता आहे. या नगरपंचायतीवर सध्यस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १३ नगरसेवक,शिवसेना शिंदे गट २ नगरसेवक,उबाठा शिवसेना १ नगरसेवक,भाजप १ नगरसेवक असे पक्षीय बलाबल आहे. या नगरपंचायतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी स्वीकृत नगरसेवक शशिकांत मोहिते यांनी आपला स्वीकृत नगरसेवक पदाचा कार्यकाळ संपल्याने राजीनामा दिला होता. या रिक्त झालेल्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी माणगाव नगरपंचायत कार्यालय याठिकाणी निवडणुकीचे पीठासन अधिकारी तथा माणगाव तालुक्याचे अतिरिक्त कार्यभार असलेले प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या अधिपत्याखाली शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ रोजी निवडणूक घेण्यात आली. या पदासाठी माणगाव नगरीतील खांदाड गावचे रहिवाशी तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते विठोबा सिताराम पालकर यांचा एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल झाल्याने दुपारी १ वाजता नगरपंचायत कार्यालय याठिकाणी पीठासन अधिकारी यांनी सर्व नगरसेवकांची विशेष सभा बोलावून माणगाव नगरपंचायतीच्या स्वीकृत नगरसेवकपदी विठोबा सिताराम पालकर हे बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करून त्यांचे अभिनंदन केले. तसेच माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आनंद यादव,राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार,माणगाव पंचायत समिती सदस्या संगीता बक्कम,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला शहराध्यक्षा योगिता चव्हाण,उपनगराध्यक्ष रिया उभारे,माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे,संदीप खरंगटे,दिलीप जाधव,हर्षदा काळे,नगरसेविका सुशीला वाढवळ,सुविधा खैरे,लक्ष्मी हिलम,माजी नगरसेवक जयंत बोडेरे,राष्ट्रवादीचे युवानेते सुमित काळे,सिद्धांत देसाई,चेतन गवाणकर,जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे,राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोशल मीडिया प्रमुख किशोरी हिरवे,संतोष मांजरे,सौरभ खैरे,राकेश पवार,सुनील धुमाळ,बाळा पवार आदींसह विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते,खांदाड गावचे ग्रामस्थ तसेच माणगाव तालुक्यातील मित्रपरिवार यांनी नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवक विठोबा पालकर यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना नगरीचे माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव म्हणाले कि,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विठोबा पालकर हे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांची माणगाव नगरपंचायतीच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याने फार आनंद होत असून त्यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा ! नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवक विठोबा पालकर म्हणाले कि,आमचे नेते खा.तटकरे साहेब,मंत्री आदिती ताई तसेच आनंदशेठ यादव यांना या निवडीचे श्रेय जाते. सर्वांच्या सहकार्याने माझी माणगाव नगरपंचायतीच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाली असून मला मिळालेल्या या संधीचे मी नक्कीच सोने करिन अशी ग्वाही दिली.

# 'नागोठण्यात प्रियदर्शनी संस्थेच्या सभासदांवर उपासमारीची वेळ येणार नाही'



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील प्रियदर्शनी चालक मालक वाहक सहकारी वाहतूक संस्थाच्या सभासदांवर उपासमारीची वेळ येण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. गेली ३० वर्षे रिलायन्स (पूर्वी आयपीसीएल) कंपनीसाठी मालवाहतूक करणाऱ्या या संस्थेला सध्या कामात मोठी घट सहन करावी लागत आहे.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना काम दिले जात असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला.

निवेदनाचे गांभीर्य लक्षात घेत खासदार तटकरे यांनी तत्काळ नागोठणे रिलायन्स कंपनीचे अध्यक्ष शशांक गोयल यांच्याशी संपर्क साधत "स्थानिकांना प्राधान्य देऊन तात्काळ काम द्या" अशी कडक सूचना केली. त्यांच्या या हस्तक्षेपामुळे संस्थेच्या सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले. याचवेळी तटकरे यांनी नागोठणे जवळील आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेमिकल्स लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक आनंद वागळे यांनाही प्रियदर्शनी संस्थेला काम देण्याच्या सूचना केल्या.

या भेटीदरम्यान प्रियदर्शनी संस्थेचे मुख्य सल्लागार भाईसाहेब टके, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर,हरिशशेठ काळे, संस्थापक मारुती देवरे, अध्यक्ष शैलेश रावकर, माजी अध्यक्ष विद्यमान संचालक बाळासाहेब टके, सिराजभाई पानसरे, सचिव शकील शेख, लियाकतशेठ कडवेकर, जितेंद्र जाधव, रमेश बोरगी यांच्यासह सभासद उपस्थित होते.

संस्थेने दिलेल्या निवेदनानुसार, रिलायन्स कंपनीत पूर्वी ६०% काम मिळत होते मागील २ वर्षांत ३०% काम कमी झाले असून १४८ सभासदांना पुरेसे काम मिळत नाही. सभासद पूर्णपणे रिलायन्स कंपनीवर अवलंबून असून ही परिस्थिती कायम राहिल्यास उपासमारीची वेळ येऊ शकते अशी भीती व्यक्त केली आहे

# भातसई येथे श्री महादाई देवी व धावीर महाराज मूर्तींचा वर्धापन दिन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र भातसई येथे श्री महादाई देवी व धावीर महाराज मूर्तींच्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवार दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन श्री महादाई देवी व धावीर महाराज देवस्थान, मंदिराजवळ करण्यात आले आहे.

या निमित्ताने श्री सत्यनारायणाची महापूजा, अभिषेक, हरिपाठ, कीर्तन व महाप्रसाद असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.०० ते ९.०० वाजता काकडा याने होणार असून, त्यानंतर ९.०० ते १०.०० अभिषेक, तसेच सकाळी ११.०० वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा होणार आहे.

सायंकाळी ६.०० ते ७.०० हरिपाठ आयोजित करण्यात आला असून, विविध पंचक्रोशीतील वारकरी संप्रदाय यामध्ये सहभागी होणार आहेत. त्यानंतर रात्री



७.०० ते ८.०० महाप्रसाद व रात्री ९.०० ते ११.०० कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. या कीर्तनासाठी ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडकर यांची उपस्थिती लाभणार असून, जोग महाराज वारकरी संस्था, देवाची आळंदी यांचा सहभाग असणार आहे.

तसेच अनेक मान्यवर कीर्तनकार व गायक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.हा सोहळा ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व युवक मंडळ भातसई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कष्टांना मिळाले सोन्याचे फळ; विद्यार्थ्यांची पोलीस सेवेत निवड

**माणगाव: प्रतिनिधी**

माणगाव शहरातील छत्रपती करिअर अकादमीने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीची साक्ष दिली आहे. या अकादमीतील चार विद्यार्थ्यांची विविध पोलीस दलात निवड झाल्याने परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची शिखरे गाठली आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कुमारी सिया संध्या संतोष सकपाळ यांची पुणे शहर पोलीसमध्ये, कुमारी रिया स्वाती सूर्यकांत मोरे यांची मुंबई शहर पोलीसमध्ये, कुमारी राखी गीता नरेश अंधेरे यांची मुंबई कारागृह पोलीसमध्ये तर हर्ष वाठोरे यांची महाराष्ट्र सुरक्षा फोर्समध्ये, दामिनी बाळकृष्ण रेणोसे, आकांक्षा खापरे विविध प्रकारच्या पोलीस दलात निवड झाली आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर आज कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबियांची साथ आणि अकादमीचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

या यशस्वी प्रवासात छत्रपती करिअर अकादमीच्या संस्थापिका माधुरी निवास साबळे आणि त्यांच्या प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेले कठोर प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन निर्णायक ठरले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत सर्वांचे अभिनंदन केले.

# पोलीस पाटील अनंत ठोंबरेंना महाराष्ट्र लोकसेवा पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत रघुनाथ ठोंबरे यांचा महाड येथे स्वराज्य भूमी गौरव संमेलनात महाराष्ट्र लोकसेवा पुरस्कार देऊन सन्माननीत करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आई फाऊंडेशन भारत, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व स्वराज्य भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्वराज्य भूमी गौरव संमेलनात सुप्रसिद्ध अभिनेता संतोष पाटील,उदय भाऊसाहेब वाघेरे, संचालक, ग्रुप ऑफ कंपनी- पिंपरी पुणे, प्रा. डॉ. बी. एन. खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन



युवा पुरस्कार विजेते, महाराष्ट्र शासन,डॉ. विनोदराव मोरे संस्थापक अध्यक्ष आई फाउंडेशन, रायगड (भारत) यांच्या हस्ते करण्यात आला. पोलीस पाटील अनंत रघुनाथ ठोंबरे हे खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष आहेत.

# आंबोट-गौळवाडी रस्त्याचे डांबरीकरण

## पोलीस मित्र संघटनचा पाठपुरावा



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आंबोट गौळवाडी रस्त्यासाठी पोलीस मित्र संघटना यांनी उपोषण करून पाठिंबा दिला होता.या आंदोलनाची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने आंबोट गौळवाडी या रस्त्याचे डांबरीकरण सुरू झाले असल्याचे दिसून आले. ग्रामस्थ मनेश मसणे यांनी पोलिस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांच्या सोबत उपोषण केले होते.

आंबोट गौळवाडी रस्ता गेली २५ वर्षे प्रलंबित होता. रस्त्यावर भर पावसात रस्त्यामधील खड्डयात बसून पोलीस मित्र संघटनेने आंदोलन केले होते. या रस्त्यावरुन विद्यार्थ्यांना चालणे शक्य होत नव्हते. त्याकडे स्थानिक सर्व राजकीय पक्षांचे नेते व सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले होते.

ही समस्या आंबोट गावातील मिनेश मसणे आणि अन्य ग्रामस्थांनी पोलीस मित्र संघटनेकडे मांडली. संघटनेने आंबोट गौळवाडी गावातील ग्रामस्थांसमवेत भर पावसाळ्यात तीन दिवस उपोषण केले. आंबोट गौळवाडी रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने काम पूर्ण केले.

# मधुमित्र, मधुसखी पुरस्कारासाठी इच्छुकांनी नामांकन सादर करावेत

**अलिबाग :रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने २०२६ साठी मधुमित्र व मधुसखी पुरस्कारासाठी नामांकने मागविण्यात येत असून इच्छुकांनी आपले नामांकन दि.०४ मे २०२६ पूर्वी मंडळाच्या जिल्हा कार्यालयात पाठवावे, असे आवाहन मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

मंडळाच्यावतीने गेल्या तीन वर्षांपासून ही पुरस्कार योजना सुरु झाली आहे. मधमाशीपालन व्यवसायास गती मिळावी व मधपाळांना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाने हा उपक्रम सुरु केला आहे. मधमाशीपालनात अनेक वर्ष काम करणाऱ्या यशस्वी मधपाळांना प्रथम, द्वितीय, व तृतीय, पुरस्काराने या पुरस्कार योजनेत सन्मानित करण्यात येते. यातील एक पुरस्कार महिला मधपाळासाठी राखीव आहे. पुरस्काराची रक्कम प्रथम (रु.११,०००/-), द्वितीय (रु.७,०००/-), तृतीय (रु.५,०००/-) अशी आहे.

दि.२० मे २०२६ रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून जि.पुणे येथे जाहीर समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील. या पुरस्काराची लिंक मंडळाच्या www.mskvib.or, या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात खादी मंडळाच्या जिल्हा कार्यालयात नामांकन अर्ज मिळू शकतील असे नित्यानंद पाटील यांनी सांगितले आहे.

# मुंबई इंडियन्सचा चेन्नईकडून पराभव

## संजू, अकिलची चमकदार कामगिरी



**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल स्पर्धेच्या १९व्या मोसमातील ३३व्या सामन्यात इतिहास घडवला आहे. चेन्नईने होम टीम मुंबई इंडियन्सचा धुव्वा उडवत आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय मिळवला.

संजू सॅमसन याने केलेल्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर चेन्नईने मुंबईसमोर २०८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मुंबईला या विजयी धावांचा पाठलाग करताना पूर्ण २० ओव्हरही खेळता आलं नाही. इम्पॅक्ट प्लेअर अकील होसेन याने ४ विकेट्स घेत फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. चेन्नईसमोर मुंबईचा डाव हा १९ ओव्हरमध्ये १०४ रन्सवर आटोपला. चेन्नईने अशाप्रकारे १०३ धावांच्या फरकाने सामना नावावर केला. चेन्नईचा हा धावांबाबत इतिहासातील सर्वात मोठा विजय ठला, तर मुंबईचा धावांबाबत हा सर्वात मोठा पराभव ठरला तसेच मुंबईचा हा या मोसमातील एकूण पाचवा तर वानखेडे स्टेडियममधील सलग आणि एकूण तिसरा पराभव ठरला.

संजू सॅमसन आणि इम्पॅक्ट प्लेअर अकील होसेन हे दोघे चेन्नईच्या विजयाचे शिल्पकार ठरले. संजूने केलेल्या शतकी खेळीमुळे चेन्नईला मुंबईसमोर २००पेक्षा अधिक धावांचं आव्हान ठेवता आलं, तर फिरकीपटू अकील होसेन याने ४ विकेट्स घेत मुंबईच्या फलंदाजीचं कंबरडं मोडलं. संजूने नाबाद १०१ धावा केल्या. त्याने यापैकी ७६ धावा या चौकार आणि षटकाराच्या मदतीने केल्या. संजूने या खेळीत १० चौकार आणि ६ षटकार लगावले. त्याला या कामगिरीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

मुंबईचा कॅप्टन हार्दिक पंड्या याने टॉस जिंकून चेन्नईला बॅटिंगसाठी भाग पाडलं. चेन्नईसाठी संजूच्या शतकाव्यतिरिक्त इतर कुणालाही मोठी खेळी करता आली नाही. कॅप्टन ऋतुराज गायकवाड याने २२, तर डेवाल्ड ब्रेव्हीस याने २१ धावांचं योगदान दिल. इतरांपैकी कुणालाही २० हा आकडा गाठता आला नाही. मुंबईसाठी अश्वनी कुमार आणि अल्लाह गजनफर या दोघांनी प्रत्येकी २-२ विकेट्स मिळवल्या, तर मिचेल सँटनर आणि जसप्रीत बुमराह या दोघांनी प्रत्येकी १-१ फलंदाजाला आऊट केलं.

मुंबईच्या फलंदाजांनी विजयी धावांचा पाठलाग करताना निराशा केली. पलटणच्या ३ प्रमुख फलंदाजांना भोपळा फोडता आला नाही. दानिश मालेवार, नमन धीर आणि शेरफेन रुदरफोर्ड हे तिघे आले तसेच गेले. सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा जोडीने ५६ चेंडूत ७६ धावांची भागीदारी करुन विजयाची आशा कायम ठेवली होती, मात्र हे दोघे आऊट झाल्यानंतर मुंबईचा पराभव निश्चित झाला. मुंबईसाठी तिलक वर्मा याने सर्वाधिक ३७ धावा केल्या, तर सूर्यकुमार यादव याने ३६ धावा जोडल्या. या दोघांव्यतिरिक्त मुंबईच्या एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. चेन्नईसाठी अकील व्यतिरिक्त इतर ५ गोलंदाजांनीही योगदान दिलं. नूर अहमद याने २ विकेट्स मिळवल्या, तर मुकेश चौधरी, अंशुल कंबोज, जेमी ओव्हरटन आणि गुरनजरप्रीत सिंह या चौकडीने प्रत्येकी १-१ विकेट मिळवली.

मुंबईच्या फलंदाजांनी विजयी धावांचा पाठलाग करताना निराशा केली. पलटणच्या ३ प्रमुख फलंदाजांना भोपळा फोडता आला नाही. दानिश मालेवार, नमन धीर आणि शेरफेन रुदरफोर्ड हे तिघे आले तसेच गेले. सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा जोडीने ५६ चेंडूत ७६ धावांची भागीदारी करुन विजयाची आशा कायम ठेवली होती. मात्र हे दोघे आऊट झाल्यानंतर मुंबईचा पराभव निश्चित झाला.

# राजस्थानचा लखनऊवर शानदार विजय

**लखनऊ : वृत्तसंस्था**

रियान परागच्या अप्रतिम नेतृत्व कौशल्यासह गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर केलेल्या गोलंदाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सच्या संघाने घरच्या मैदानात खेळणाऱ्या ऋषभ पंतच्या लखनऊ सुपर जाएंट्सला ४० धावांनी पराभूत केले. लखनऊच्या संघावर सलग चौथ्या पराभवाची नामुष्की ओढावली. दुसरीकडे दोन पराभवानंतर दमदार कमबॅक करत राजस्थान रॉयल्सचा संघ सातव्या सामन्यातील पाचव्या विजयासह १० गुणांची कमाई करत गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी पोहचला आहे.

लखनऊच्या इकाना स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना आघाडीचे फलंदाज अपयशी ठरल्यावर रवींद्र जडेजाने २९ चेंडूत केलेल्या ४३ धावांच्या खेळीच्या जोरावर राजस्थानच्या संघाने निर्धारित २० षटकात ६ बाद १५९ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना सलामीवीर मिचेल मार्शच्या अर्धशतकी खेळीशिवाय एकाचाही निभाव लागला नाही. परिणामी लखनऊचा संघ १८ षटकात ११९ धावांतच आटोपला.

नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी जोडी लखनऊच्या मैदानात खास छाप सोडण्यात अपयशी ठरली. यशस्वी १२ चेंडूत २२ धावा करून परतल्यावर त्याच्या जागी आलेल्या ध्रुव जुरेल आल्या पावली माघारी फिरला. या दोन्ही विकेट्स शमीने घेतल्या. रियान पराग १९ चेंडूत २०. तर शिमरॉन हेटमायर १८ चेंडूत २२ धावा करून परतल्यावर रवींद्र जडेजाने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्याने २९ चेंडूत नाबाद ४३ धावांची खेळी करत फरेरा २० (१९) आणि शुभमन दुबे १९ (११) यांच्या साथीने संघाच्या धावफलकावर निर्धारित २० षटकात ६ बाद १५९ धावा लावल्या. लखनऊकडून गोलंदाजीत शमीशिवाय प्रिन्स यादव, मोहसिन खान यांनी प्रत्येकी दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या.

# लॉरा वूल्फार्टचा शतकी धमाका

## स्मृती मानधनाच्या विश्वविक्रमाशी बरोबरी



**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाने भारताविरुद्धचा तिसरा टी-२० सामना जिंकत धडाकेबाज कामगिरी केली. यासह त्यांनी पाच सामन्यांच्या टी२० मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेतली आणि मालिका जिंकली. यात कर्णधार लॉरा वुल्फार्टने महत्त्वाची भूमिका बजावली आणि स्मृती मानधना, मेग लॅनिंग यांच्या नावावर असलेल्या विश्वविक्रमाची बरोबरी केली.

तिसऱ्या सामन्यात शफाली वर्माच्या ६४ धावा आणि हरमनप्रीत कौरच्या ६६ धावांच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी १९३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वूल्फार्टने पहिल्या चेंडूपासूनच दमदार खेळी केली. तिने आपल्या कारकिर्दीतील सर्वात जलद शतक झळकावले. या वादळी शतकामुळे तिच्या संघाला विजयाचा मार्ग सोपा झाला. लॉराने ५३ चेंडूंमध्ये ११५ धावांची खेळी केली. २१६.९८च्या स्ट्राईक रेटने खेळलेल्या या खेळीत पाच षटकार आणि १४ चौकारांचा समावेश होता.

लॉराने ४७ चेंडूंमध्ये आपले टी-२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले. महिलांच्या झटपट क्रिकेटमधील हे चौथे सर्वात जलद शतक ठरले. लॉराचे हे तीनही फॉरमॅटमध्ये मिळून १७वे शतक ठरले. तिच्या आधी केवळ स्मृती मानधना आणि मेग लॅनिंग या दोघांनीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७ शतके ठोकण्याचा विश्वविक्रम केला आहे. या विश्वविक्रमाची लॉराने बरोबरी केली.

# वैभव सूर्यवंशीने मोडला मॅक्सवेलचा रेकॉर्ड!

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल स्पर्धेत १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीचा बोलबाला पहायला मिळाला आहे. बुधवारी झालेल्या लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळणारा वैभव अवघ्या आठ धावा करून माघारी परतला. तरीदेखील त्याने आयपीएल स्पर्धेतील मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.



वैभवने स्पर्धेत सर्वात जलद ५०० धावा करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. त्याने हा पराक्रम अवघ्या २२७ चेंडूत पूर्ण केला. या रेकॉर्डमध्ये वैभवने ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज ग्लेन मॅक्सवेलला मागे टाकले आहे. मॅक्सवेलने हा पराक्रम २६० चेंडूत केला होता. प्रियांश आर्य आणि वीरेंद्र सेहवागने हा कारनामा प्रत्येकी २८० चेंडूत केला होता, तर मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज नमन धीरने हा कारनामा २८३ चेंडूंचा सामना करून दाखवला होता.

याआधीही वैभवने मॅक्सवेलचा एक मोठा रेकॉर्ड मोडून काढला होता. वैभवने १३ सामन्यानंतर सर्वाधिक षटकार मारण्याच्या रेकॉर्डमध्ये मॅक्सवेलला मागे टाकले होते.






# विनोद कांबळीचे जाहिरातीमध्ये कमबॅक



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी गेल्या काही काळापासून त्याच्या डाऊन फॉल आणि शारीरिक व्याधींबाबत जास्त चर्चेत होत असते तसेच त्याची आर्थिक स्थितीदेखील अत्यंत बेताची झाली आहे, मात्र या माजी क्रिकेटपटूने आपली जिद्द सोडलेली नाही. त्याने कमबॅक करण्याचा जोरदार प्रयत्न केला आहे.

विनोद कांबळी हा एका जाहिरातीत झळकला आहे. त्याने एका आईसक्रीम ब्रँडची जाहिरात केली असून यात त्याच्या परिस्थितीचा भावनिकरित्या उत्तम वापर करून घेण्यात आला आहे.

विनोदचे जिनके लिये लाईफ मे कम मिला उनके लिये थोडा ज्यादा... हे वाक्य मनाला स्पर्श करून जाते. ही जाहिरात ज्यावेळी आईस्क्रीमची मागणी प्रचंड असते, त्या उन्हाळ्याच्या काळात आली आहे.

विनोद कांबळी गंभीर आजारामुळे त्रस्त आहे. त्याला उपचारासाठीदेखील पैसे नाहीयेत. त्यामुळे वेळोवेळी माजी क्रिकेटपटू त्याला आर्थिक मदत करण्याचे आवाहन करत असतात. अशातच आता विनोदची ही जाहिरात सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. त्यामुळे आता तो आयुष्याच्या या टप्प्यावरदेखील जोरदार कमबॅक करणार अशी आशा पल्लवीत झाली आहे.

# लखनऊच्या स्टेडियममध्ये दोन प्रेक्षकांत हाणामारी



**लखनऊ : रामप्रहर वृत्त**

लखनऊच्या इकाना स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात मैदानावरील खेळाइतकीच प्रेक्षकांमधील मारामारीची चर्चा होत आहे. सामना सुरू असतानाच दोन चाहत्यांमध्ये जोरदार भांडण झाले आणि काही क्षणांतच हा वाद लाथाबुक्क्यांपर्यंत पोहोचला. या घटनेचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

लखनऊ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील सामन्यादरम्यान हा प्रकार घडला. व्हायरल व्हिडीओमध्ये दिसत आहे की, एका व्यक्तीने दुसऱ्याला जोरात ढकलून खाली पाडले. तो व्यक्ती खालील रांगेत जाऊन पडला, मात्र काही क्षणांतच तो पुन्हा उठला आणि दोघांमध्ये पुन्हा जोरदार हाणामारी सुरू झाली.

या गोंधळात एका व्यक्तीने चप्पल काढून दुसऱ्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. आजूबाजूला बसलेले प्रेक्षक घाबरून दूर सरकत असल्याचेही व्हिडीओमध्ये दिसत आहे. काही लोकांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, तर एकजण सुरक्षा रक्षकांना बोलावण्यासाठी ओरडताना दिसला.






# दुहेरी जगज्जेतपदाची भारताला संधी, पण आव्हान खडतर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बुद्धिबळात पुरुष आणि महिला जगज्जेते एकाच देशाचे असण्याची किमया आजवर केवळ दोनच देशांना साधली होती. पूर्वीचा सोव्हिएत रशिया आणि विद्यमान चीनने हे करून दाखवले. आता भारतालाही संधी आहे, पण दोम्माराजू गुकेश आणि रमेशबाबू वैशाली या दोघांसमोरचे अंतिम आव्हान खडतर आहे.

गुकेश तर विद्यमान जगज्जेता आहे. या वर्षाच्या अखेरीस त्याच्या जगज्जेतेपदास आव्हान देईल उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव. वैशाली जगज्जेतेपदापासून एक पाऊल दूर आहे, मात्र तिच्या मार्गात उभी आहे चीनची विद्यमान बुद्धिबळ जगज्जेती जू वेनजून. वैशाली आणि सिंदारोव या दोघांनी नुकतीच सायप्रस येथील कँडिडेट्स स्पर्धा जिंकली.

बुद्धिबळामध्ये जगज्जेत्याचा आव्हानवीर ठरवण्यासाठी कँडिडेट्स स्पर्धा घेतली जाते. गेल्या खेपेस ही स्पर्धा गुकेशने जिंकली, त्यामुळे तो त्या वेळचा जगज्जेता चीनच्या डिंग लिरेनचा आव्हानवीर ठरला होता. पुढे लिरेनला हरवून तो जगज्जेताही बनला. वैशाली गेल्या खेपेला उपविजेती ठरली, त्यामुळे तिला जगज्जेतेपदाच्या लढतीत खेळण्याची संधी मिळाली नव्हती. यावेळी मात्र तिने जिद्दीने खेळून अजिंक्यपद मिळवले आणि तीदेखील जगज्जेतेपदाच्या लढतीसाठी सिद्ध झाली आहे.

जगज्जेता बनल्यापासून गुकेशची लय काहीशी बिघडल्यागत झाली आहे. तो २०२४च्या अखेरीस २७९४ एलो गुणांवर होता. त्याला प्रथमच २८०० एलो गुणांचा टप्पा गाठण्याची संधी होती, पण गतवर्षी सुरुवातीपासून त्याचा खेळ त्याच्या लौकिकास साजेसा फारसा झाला नाही.

गेल्या १५ महिन्यांत त्याच्या एलो गुणांमध्ये २७९४वरून २७३२ गुणांपर्यंत मोठी घसरण झाली. एके काळी तो जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर होता. आज तो १७व्या स्थानापर्यंत खाली आलेला आहे. सध्याची स्थिती पाहता गुकेशविरुद्ध जगज्जेतेपदाच्या लढतीमध्ये सिंदारोवचे पारडे जड असल्याचे अनेकांना वाटते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com